दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०६ | मंगळवार दि.०६ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

अंतर्विरोध मिटण्यासाठी जनगणना आवश्यक !

आपल्या आरक्षणात नवा वाटेकरी कुणालाच नको आहे. काहींना आपली आरक्षणाची वर्गवारी बदलून हवी आहे तर काहींची आम्ही मागास असूनही आम्हाला आरक्षण मिळत नाही, ही तक्रार आहे. ज्यांना आरक्षण मिळाले आहे त्यांच्यातील उतरंडीत खाली असलेल्यांची आमच्यापर्यंत आरक्षणाचे लाभ पोहोचत नसल्याची तक्रार आहे. एकंदर काय तर आरक्षण या विषयावरून सामाजिक वीणच उसवणार का? अशी शंका निर्माण करणारी सध्याची परिस्थिती आहे.

भारत–बांगलादेश सीमेवर हाय अलर्ट

नवी दिल्ली: बांग्लादेश मधील आरक्षणाच्या मुद्यावरून हिंसाचार पेटला आहे. या पार्श्वभूमीवर बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशातील सीमेवर भारतीय सुरक्षा दलाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला असून, कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. बांगलादेशमधील कायदा आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर बीएसएफने भारत–बांगलादेश सीमेवर हाय अलर्ट जारी केला आहे. बीएसएफचे डीजीही कोलकता येथे पोहोचले आहेत, असे बीएसएफच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे.

नैसर्गिक आपत्तिसाठी आता तीन हेक्टरपर्यंत भरपाई मिळणार!

राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय, शेतकऱ्यांना दिलासा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात अतिवृष्टी, पूर, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तिमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना ३ हेक्टर पर्यंत मदत दिली जाणार, असा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. पूर्वी ही मदत २ हेक्टर पर्यंतच मर्यादित होती. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा समाधानकारक निर्णय असल्याचे बोलले जात आहे.

नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांचे आपले आर्थिक गणित बिघडते. त्यामुळे नुकसानीची भरपाई मिळवण्यासाठी राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नैसर्गिक आपत्तिमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना फक्त २ हेक्टर जमिनीपर्यंतच मदत दिली जात होती. पण आता या मर्यादेत वाढ करून ३ हेक्टर पर्यंत मदत दिली जाणार आहे. त्यामुळे आता अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात मदत जमा केली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना पैसे मिळवण्यासाठी कार्यालयात हेलपाटे घालावे लागणार नाहीत. आपत्ती व्यवस्थापन विभागाने निश्चित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींसह, ◀◀ पान २ वर

राज ठाकरेंना टाडा लावून अटक करा–आंबेडकर

पुणे । प्रतिनिधी

राज ठाकरेंना टाडा लावून अटक केले पाहिजे असे विधान बहुजन विकास आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. सरकारने मागे पुढे न पाहता त्यांनी आत टाकले पाहिजे असे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे. राज ठाकरेंनी परप्रांतीयांवरुन केलेल्या विधानावरुन प्रकाश आंबेडकर यांनी हे विधान केले आहे. अमोल मिटकरी यांनी राज ठाकरेंवर केलेल्या विधानावरुन वाद पेटलेला असताना, आता प्रकाश आंबेडकर यांच्या विधानामुळेही वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

बाहेरच्या राज्यांमधून मुले येतात आणि आपल्या राज्यातील नोकऱ्या बळकावतात. आपल्या राज्यातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेतात. ठाणे, पुणे, नागपुरात ज्याप्रकारचे फ्लायओव्हर्स, ब्रीज आणि इतर सगळ्या गोष्टी मूळच्या लोकसंख्येसाठी नाही तर बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी होतात. म्हणजे बाहेरुन येणाऱ्या लोकांचा लोंढा किती मोठ्या प्रमाणात आहे. येथे या शहरात आल्यानंतर त्यांची व्यवस्था करण्यात सरकारचा इतका पैसा खर्च होतो. राज्यात इतक्या गोष्टी उपलब्ध असताना महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाही. महाराष्ट्रातील मुला मुलींना ◀◀ पान २ वर

विजेच्या धक्क्याने ९ कावड यात्रेकरूंचा मृत्यू

वैशाली: बिहारमधील वैशाली येथील सुलतानपूर गावात हाय–व्होल्टेज ओव्हरहेड वायरच्या संपर्कात आल्याने नऊ कावड यात्रेकरूंचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत.

श्रावणातील सोमवारी जलाभिषेक करण्यासाठी जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाला हाय टेंशन वायरचा धक्का लागला, या घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला. हाजीपूर औद्योगिक पोलिस स्टेशन हद्दीतील सुलतानपूर येथे हा अपघात झाला. इथे श्रावण महिन्यात गावातील मुले दर सोमवारी जवळच्या हरिहरनाथ मंदिरात जलाभिषेक करायला जात असतात. ◀◀ पान २ वर

राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलमध्ये राडा मराठा आंदोलक–मनसैनिक आमने सामने

धाराशिवमधील प्रकार; आरक्षणाच्या वक्तव्याचे पडसाद, ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी

धाराशिव । प्रतिनिधी

सोलापुर येथे आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्याचे पडसाद धाराशिवमध्ये उमटले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे मुक्कामी असलेल्या हॉटेलमध्ये मराठा आंदोलक शिरले आहेत. त्यांनी ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे या हॉटेलमध्ये बराच वेळ राडा झाला. यावेळी मराठा आंदोलक आक्रमक असल्याचे दिसत होते.

राज ठाकरेंचा महाराष्ट्र दौरा सुरु आहे, सोलापुर जिल्ह्यात असताना राज ठाकरे यांनी आरक्षणाबाबत वक्तव्य केले होते. त्यानंतर ते या दौऱ्यादरम्यान धाराशिवमधील एका हॉटेलमध्ये मुक्कामी थांबले होते. सोलापुरातील वक्तव्याचे पडसाद धाराशिवमध्ये उमटले. मराठा आंदोलक धाराशिवमधील पुष्पकपार्क या राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलमध्ये घुसले. यावेळी मराठा आंदोलकांनी राज ठाकरे यांची रितसर वेळही मागितली होती. मात्र ठाकरे यांनी भेट नाकारली. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. मनसेच्या कार्यकर्त्यांनी मराठा ◀◀ पान २ वर

राज ठाकरे नेमकं काय म्हणाले?

बाहेरच्या राज्यांमधून मुलं येतात आणि आपल्या राज्यातील नोकऱ्या बळकावतात. आपल्या राज्यातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेतात. आपल्या मुला मुलींना मिळत नाही. ठाणे, पुणे, नागपुरात ज्याप्रकारचे फ्लायओव्हर्स, ब्रीज आणि इतर सगळ्या गोष्टी मूळच्या लोकसंख्येसाठी नाही तर बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी होतात. म्हणजे बाहेरुन येणाऱ्या लोकांचा लोंढा किती मोठ्या प्रमाणात आहे. येथे या शहरात आल्यानंतर त्यांची व्यवस्था करण्यात सरकारचा इतका पैसा खर्च होतो. राज्यात इतक्या गोष्टी उपलब्ध असताना महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाही. महाराष्ट्रातील मुला मुलींना आधी प्राधान्य द्या आणि उरल्या तर बाहेरच्यांना बोलवा असे मी आधीपासूनच सांगत आहे, असे राज ठाकरे म्हणाले आहेत.

आयशर-दुचाकीच्या अपघाता पती ठार तर पत्नी जखमी

घनसावंगी : घनसावंगी–पाथरी रस्त्यावरील सिंदखेड येथे दुचाकी व आशयरच्या धडकेत पती ठार तर पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना आज ५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडली. यात उमेश जैवळ हे जागीच ठार झाले तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाल्या आहेत. घनसावंगी तालुक्यातील मंगु जळगाव येथील राहणारे उमेश जैवळ हे आपल्या ◀◀ पान २ वर

मराठा समाजाने स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली

चंद्रकांत पाटलांचे वक्तव्य; आर्थिक मागास आरक्षण गेल्याने नुकसान

नाशिक : देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आरक्षण महाविकास आघाडीला टिकवता आले नाही. सरसकट आरक्षण देणे घटनाबाह्य आहे. आर्थिक मागास आरक्षण गेल्याने मराठा समाजाने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली, असे वक्तव्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. नाशिक येथे पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, १९६७ साली ओबीसी आरक्षणाची सुरुवात झाली. ज्यांना मागास ठरवले गेले त्यांना घटनात्मक आरक्षण दिले गेले. शाहू महाराजांच्या काळात आरक्षण दिले गेले. देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण दिले ते महाविकास आघाडीला टिकवता आले नाही. सरसकट आरक्षण देणे हे घटनाबाह्य आहे. आर्थिक मागास प्रवर्गाला १० टक्के एससीबीसी आरक्षण दिले. ज्यांना जातीय आरक्षण आहे त्यांना एससीबीसी आरक्षण दिले जात नाही. आर्थिक मागास आरक्षण गेल्याने मराठा समाजानं स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली, असे त्यांनी म्हटले. ◀◀ पान २ वर

तुम्ही फडणवीसांची सुपारी घेतली, मला धमकी देऊ नका नाहीतर...

मनोज जरांगेंचा नारायण राणेंना निर्वाणीचा इशारा

अमरावती: देवेंद्र फडणवीसांना मोठं करण्यासाठी माझ्या समाजाचे वाटोळे करू नका, असे म्हणत मनोज जरांगेंनी भाजप खासदार नारायण राणे यांच्यावर निशाणा साधला आहे. मला धमकी देऊ नका, मी गोरगरिबांसाठी काम करतो, तुम्हीच फडणवीसांची सुपारी घेतली आहे, असेही जरांगे यावेळी म्हणाले.

राज्याच्या राजकारणात आरक्षणाचा मुद्दा चांगलाच गाजतोय. मराठा आंदोलक मनोज जरांगेंच्या ◀◀ पान २ वर

दूध भेसळखोरांवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी

आष्टी । प्रतिनिधी

दूध भेसळखोरांच्या विरोधात राज्य सरकारने स्वतंत्र कायदा करावा.किंवा जसं वाळू माफिया आणि गुटखा माफियावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई चा समावेश केला तसाच दूध माफीया आणि दुग्धजन्य

भेसळखोरांना गावकऱ्यांनी 'विषकालवे' ही पदवी द्यावी– माजी मंत्री सुरेश धस

पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या लोकांच्या विरोधात मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करावी आणि हा निर्णय आगामी कॅबिनेट किंवा पुढच्या कॅबिनेट मध्येच घेण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री, ◀◀ पान २ वर

बम. बम..भोलेनाथ..!

परळी: श्रावण मासानिमित्त राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या 'नाथ प्रतिष्ठाण' या सामाजिक संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी ना.धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ५ वे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व संपूर्ण मंदिरासह मुख्य गाभाऱ्यात २१ प्रकारच्या फुलांनी खास सजावट करण्यात आली आहे. या मंदिर परिसराचे विहंगम दृश्य ड्रोन कॅमेऱ्याने परळीतील छायाचित्रकार जयराम गोंडे (स्माईल डिजिटल) यांनी टिपले आहेत.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू :१.५० क्विंटल			
	२,५०१	२,५११	२,५०६
ज्वारी/हायब्रिड :३१.०० क्विंटल			
	२,१५७	२,६६२	२,३६१
मूग :१४.५० क्विंटल			
	१,९५०	३,०४१	२,४५५
तूर : २.०० क्विंटल			
	९,४०१	९,४०१	९,४०१
उडीद : २.५० क्विंटल			
	४,९०१	७,४००	६,१५०
बाजरी: १२.०० क्विंटल			
	२,४६१	३,४००	२,७५२
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: १३.०० क्विंटल			
	४,२६०	४,३००	४,२८०
हरभरा: ३.५० क्विंटल			
	४,५००	६,५९९	५,६५१

ट्रकला आग : खंडीभर शेळ्या–मेंढ्या जळून खाक

बीड । प्रतिनिधी

गेवराईहून बीडकडे मेंढ्या–शेळ्या घेऊन येणाऱ्या ट्रकला अचानक आग लागली. या आगीमध्ये ३० पेक्षा जास्त शेळ्या–मेंढ्या जळून खाक झाल्याची घटना मध्यरात्री बारा वाजण्याच्या दरम्यान पाडळसिंगीच्या टोलनाक्याजवळ घडली. ट्रकला आग लागल्यानंतर अनेकांनी घटनास्थळी धाव घेऊन आतील काही शेळ्या– मेंढ्यांना बाहेर काढल्याने त्या वाचू शकल्या. यात ट्रकचेही मोठे नुकसान झाले.

मध्यरात्रीच्या दरम्यान एक ट्रक गेवराईहून बीडकडे शेळ्या–मेंढ्या घेऊन येत होता. पाडळसिंगीच्या टोलनाक्याजवळ ट्रक (आर.जे.१९ जीजे ४७९७) ला अचानक आग लागली. ट्रकला आग लागल्याचे चालकाच्या निदर्शनास ◀◀ पान २ वर

दिल्लीतील कोचिंग सेंटर्स बनली आहेत डेथ चेंबर्स–सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्लीच्या जुन्या राजिंदर नगरमधील कोचिंग सेंटरच्या तळघरात पुरामुळे नागरी सेवा परीक्षांची तयारी करणाऱ्या तिघांच्या मृत्यूची सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्वत:हून दखल घेतली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने केंद्र आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. दिल्लीतील कोचिंग सेंटर्स डेथ चेंबरर्स बनली आहेत, असे निरीक्षणही यावेळी खंडपीठाने नोंदवले.

या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्रासह दिल्ली सरकार आणि दिल्ली महानगरपालिकेला सध्या अस्तित्वात असलेल्या सुरक्षेच्या नियमांचे तपशीलवार उत्तरे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. खंडपीठाने कोचिंग सेंटर्समधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबद्दल आणि आरोग्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. खंडपीठाने नमूद केले की, दिल्लीतील कोचिंग सेंटर्स हे सुरक्षिततेच्या नियमांचे आणि जीवनासाठी मूलभूत मानकांचे पूर्णपणे पालन करत नाहीत तोपर्यंत ते ऑनलाइन काम करू शकतात. या संस्था देशाच्या विविध भागांतून आलेल्या ◀◀ पान २ वर

अग्रलेख

अंतर्विरोध मिटण्यासाठी जनगणना आवश्यक !

आपल्या आरक्षणात नवा वाटेकरी कुणालाच नको आहे. काहींना आपली आरक्षणाची वर्गवारी बदलून हवी आहे तर काहींची आम्ही मागास असूनही आम्हाला आरक्षण मिळत नाही, ही तक्रार आहे. ज्यांना आरक्षण मिळाले आहे त्यांच्यातील उतरंडीत खाली असलेल्यांची आमच्यापर्यंत आरक्षणाचे लाभ पोहोचत नसल्याची तक्रार आहे. एकंदर काय तर आरक्षण या विषयावरून सामाजिक वीणच उसवणार का? अशी शंका निर्माण करणारी सध्याची परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय पीठाने जो आरक्षणात वर्गवारी करण्यास होकार देणारा निर्णय सहा विरुद्ध एक अशा बहुमताने दिला आहे तो आरक्षणाचा गुंता सोडवणारा ठरणार की वाढविणारा? अशी शंका उपस्थित करणारा आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणास परवानगी देताना त्याबाबतचे अधिकार राज्य सरकारांकडे सोपविले आहेत. आरक्षणात आरक्षण देण्यास परवानगी देण्यामागे सर्वोच्च न्यायालयाचा सर्वांना समान लाभ मिळावा हा हेतू आहे. त्याला आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र, हा समान लाभ पारदर्शीपणे दिला जाईल व तसा तो स्वीकारला जाईल का? ही खरी शंका आहे. असा पारदर्शीपणा येण्यासाठी व तो सर्वमान्य होण्यासाठी शाब्दिक बेल-भंडाऱ्याची नव्हे तर ठोस आकडेवारीची गरज असते. अशी आकडेवारी प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे देशात जातनिहाय जनगणना करणे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली आहे. मात्र, देशाच्या ऐक्याच्या भ्रामक कल्पना पुढे करून अशा जनगणनेला विरोध केला जातो आहे. मग अंतर्विरोध मिटणार कसे? प्रश्न जोपर्यंत मिटत नाहीत तोवर आरक्षणातील आरक्षणाची व्यवस्था पारदर्शी असल्याचा विश्वास सर्वमान्य कसा होईल? न्यायालयाने ती जबाबदारी राज्यकर्त्यांवर सोपवली आहे व त्यांच्याकडून अशा पारदर्शक धोरण निर्मितीची अपेक्षा व्यक्त केली आहे. ते ही योग्यच कारण धोरण ठरविणे ही राज्यकर्त्यांचीच जबाबदारी मात्र, ही जबाबदारी राज्यकर्ते निष्पक्षपणे पार पाडतात का? हा खरा प्रश्न असून, त्याचे उत्तर शोधल्यास ते नकारार्थीच येते कारण राज्यकर्त्यांना सर्वमान्य तोडगा काढण्यात वारंवार अपयश आल्यानेच आज जाती-जातींमधील अंतर्विरोध एवढे उफाळून आले आहेत. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाच्या या आरक्षणातील आरक्षणाच्या निर्णयाने गुंता सुटणार की वाढणार? अशी शंका निर्माण केली आहे. विशेष म्हणजे हा निकाल सात न्यायाधीशांच्या घटनापीठाचा. त्यात एक मत आरक्षणात आरक्षण देण्याच्या विरोधात. मात्र, उर्वरित सहा न्यायमूर्तींपैकी पाच जणांनी वेगवेगळी निकालपत्रे दिली आहेत. त्यामुळे निकालातील या दुभंगाचा या निर्णयाची अंमलबजावणी करणारी राज्य सरकारे कसा अर्थ घेणार? असा प्रश्न उपस्थित होतो.

निकालपत्राच्या दोन संकल्पनांतील तफावत आहे ती जातीचे वा समूहाचे मागासलेपण आणि क्रिमिलेयर या संकल्पनात. आरक्षणातील आरक्षण देताना ज्यांना लाभ मिळत नाही त्यांना तो मिळवून देण्यासाठी क्रिमिलेयरची संकल्पना ओबीसींप्रमाणे अनुसूचित जातींनाही लागू करावी असे चार न्यायमूर्ती आपल्या निकालपत्रात सुचवितात. आजवर आपले आरक्षण धोरण 'समूह' हा घटक मानणारे होते. पण चार न्यायमूर्तींचे निकालपत्र क्रिमिलेयरची चाळणी लावून ते कौटुंबिक पातळीवर आणून ठेवते. तर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. मनोज मिश्रांचे निकालपत्र 'एखादी जात अथवा समूह मागास असल्याकारणानेच त्यांना प्रतिनिधित्व मिळत नाही, हे राज्ययंत्रणेने सिद्ध केले पाहिजे', अशी स्पष्ट अट या आरक्षणातील आरक्षणासाठी घालते. त्यामुळे आता धोरण ठरविताना राज्य व केंद्र सरकारांना या निकालपत्राचा जास्त साकल्याने विचार करावा लागेल. तसा तो होणार का आणि झालेला तो विचार सर्वमान्य होणार का? हा खरा प्रश्न.

आरक्षणाची मागणी करणाऱ्यांसाठी जसा हा प्रश्न महत्त्वाचा तसाच याबाबतचे धोरण ठरविण्याची जबाबदारी खांद्यावर आलेल्या राज्यकर्त्यांसाठीही महत्त्वाचा कारण आरक्षणात आरक्षण देताना जे धोरण ठरवायचे त्याने दोन्ही बाजूंचे एकाचवेळी समाधान करता येईल एवढी सरळ परिस्थिती सध्या खचितच राहिलेली नाही.

आपल्या ताटातील काही घास आपल्याच भाऊबंदांना काढून देण्याची कुणाची तयारी असल्याचे दिसत नाही. असा प्रयत्न झाल्यास त्याला विरोध होणारच. त्याचे समाधान पारदर्शीपणे करायचे तर ठोस आकडेवारीच्या आधारावर निकष निश्चित करून धोरण तयार करावे लागेल आणि अशा धोरणासाठी देशात जातनिहाय जनगणना हाच योग्य पर्याय ठरतो. त्यातून आरक्षणातील आरक्षणाबाबत सध्या निर्माण झालेल्या व भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या प्रश्नांवर व अंतर्विरोधावर सर्वमान्य तोडगा काढणारे धोरण निश्चित करता येऊ शकते. न्यायालयाने संविधानविषयक प्रश्न सोडविण्याचे आपले काम पार पाडताना आपल्या निकालाद्वारे आता राज्यकर्त्यांनी आपली जबाबदारी पार पाडावी, अशीच अपेक्षा व्यक्त केली आहे. ती राज्यकर्ते कशी पेलतात यावर हा आरक्षणातील आरक्षणाचा निर्णय गुंता सोडवणारा ठरणार की वाढवणारा? या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असणार आहे.

बिंदुसरा पुलावरील रस्त्याने घेतला मोकळा श्वास

शहर वाहतूक शाखेच्या वतीने अतिक्रमणधारकांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

शहर वाहतूक शाखेच्या वतीने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून माळवेस पर्यंत रस्ता अतिक्रमण मुक्त केला .यावेळी बिंदुसरा पुलावरील रस्त्यावर एका बाजूने पूर्णपणे दुकानदारांनी आणि वाहनधारकांनी अतिक्रमण केले होते. हे अतिक्रमण शहर वाहतूक शाखेच्या पोलिस अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पूर्णपणे मोकळे केले ही कारवाई सोमवारी करण्यात आली.

बीड शहरातील पेठ बीड भागात जाणारा आण्णाभाऊ साठे चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापर्यंत रस्ता वाहनधारकांनी अतिक्रमित केला होता. शहर वाहतूक शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी माळीवेस ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत रस्ता दुतर्फा मोकळा केला विशेष म्हणजे बिंदुसरा नदीच्या पुलावरील दुतर्फा असलेला रस्ता एका बाजूने पूर्णपणे दुकानदार आणि वाहनधारकांनी बंद केला होता .या ठिकाणी पूर्णपणे अतिक्रमण झाले होते. या अतिक्रमणामुळे हा रस्ता कायम एका बाजूने चालू होता. मात्र शहर वाहतूक शाखेने सोमवारी हा रस्ता पूर्ण अतिक्रमणे काढून मोकळा केला त्यामुळे या रस्त्याचा श्वास मोकळा झाला. बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पुलापासून साठे चौकापर्यंत रस्ता कायम वाहनांनी वेढलेला असतो. त्यामुळे शहरातील नागरिकांना याचा मनस्ताप सहन करावा लागतो. वेडी वाकडी लावलेली वाहने रिक्षा, भाजीपाल्याचे गाडे ,इतर वस्तूचे फेरीवाले आणि त्यांचे गाडे यामुळे हा रस्ता कायम ट्राफिक जाम असतो. मात्र शहर वाहतूक शाखेने हा रस्ता अतिक्रमण हाटवून पूर्णपणे मोकळा केला आहे. त्यामुळे आता नागरिक ही शहर वाहतूक शाखेचा पोलीस अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धन्यवाद देत आहेत.

तहसीलदाराच्या आशीर्वादाने वाळू माफियांचा धुमाकूळ !

हायवा मध्ये वाळूचा जास्त लोड मुळे रस्त्यावर पडले खड्डे

जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्यामध्ये तहसीलदार यांच्या आशीर्वादामुळे वाळूमाफ्याचा धुमाकूळ हायवा मध्ये जास्त वाळू भरल्यामुळे रस्त्याला पडले खड्डे याला जबाबदार कोण असे सामान्य नागरिकाकडून बोलल्या जात आहे याप्रकरणी जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांनी तत्काळ लक्ष द्यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकाकडून करण्यात येत आहे. तालुक्यातील सासखेडा, टाकळखोपा, तळणी येथील वाळू साठ्यावरून जुन्या ऑनलाइन रॉयल्टीवर मोठ्या प्रमाणात टाकळखोपा, वाघाळा, कानडी, देवठाणा या ठिकाणाहून चोरटी वाहतूक सर्रास सुरू आहे.

मंठा तालुक्यातील तळणी परिसरातील पुर्णापाटी ते वाघाळा या ६ कि.मी. रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे. टाकळखोपा येथील रस्त्यांवरील खड्ड्यात शाळकरी विद्यार्थ्यांचे वाहन फसल्यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ' त्या ' खड्ड्यांत चक्क तीन तास आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे टाकळखोप्यातील वाळू चोरीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे .टाकळखोपा येथे रात्रंदिवस अवैध वाळू उत्खनन करून चोरी सुरू असते. भर पावसाळ्यात नदीच्या पाण्यातुन किन्ही व्दारे वाळू उपसा सुरू आहे . अवैध वाळू वाहतूकीमूळे वाघाळा - टाकळखोपा - इंचा

- पुर्णा पाटी या ६ कि. मी रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे . यातील वाघाळा - टाकळखोपा - इंचा या चार कि. मी रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी तब्बल पाच कोटीचा निधीतून नवीन तयार झालेल्या रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले. 'त्या ' खड्ड्यात चिखल व पाणी साचुन छोटी वाहने फसत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. या आंदोलनामुळे टाकळखोपा येथील वाळू साठ्यांवर वाळू भरण्यासाठी आलेली शेकडो वाळूची वाहने अडकून पडत आहेत. पुर्णापाटी ते वाघाळा दरम्यानच्या मोठमोठ्या खड्ड्यामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. वाळू माफियांनी महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत आर्थिक हितसंबंध जोपासून बेकायदेशीर रित्या मुरूम चोरी करून नदीपात्रातून रस्ते तयार केल्यामुळे शेकडो हायवाद्वारे वाळू वाहतूक सुरू आहे.टाकळखोपा येथील वाळू साठ्यांवर महसूलचे कर्मचारी नसुन डेपोधारक नसतांना वाळू वाहनधारकांनी डेपो ताब्यात घेऊन जेसीबीच्या साह्याने वाळू वाहनात भरली जात असूनही तहसीलदार सोनाली जोंधळे, मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी व तलाठी महेंद्र साळवे यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. रविवार ता.४ रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे सासखेडा येथील वाळू डेपो वरुन रॉयल्टीच्या नावाखाली टाकळखोपा , कानडी , देवठाणा येथुन अनेक वाहने अवैध वाळू भरून मंठाकडे व विदर्भातील लोणारकडे जात होती. यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडत आहे.

पहिल्याच श्रावण सोमवारी लाखो भक्तांनी प्रभु वैद्यनाथाचे दर्शन

परळी । प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी पहिल्याच श्रावण सोमवारी वैद्यनाथाच्या परळीत लाखो शिवभक्तांनी गर्दी केली होती. परळीच्या पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिरासह बीड जिल्ह्यातील सर्वच शिवालये गजबजून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले. हर हर महादेव... प्रभु वैद्यनाथ महाराज की जय.. ओम नमः शिवाय आदी शिवनामाचा जयघोष शिवभक्तांनी केला. यामुळे मंदिर परिसर शिवभक्तांनी दुमदुमून गेला होता. मंदिर परिसरात पोलीस प्रशासनातर्फे कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या वैद्यनाथाच्या दर्शनासाठी परळी परिसरात गर्दी केली होती. दर्शन सुलभ व्हावे, यासाठी वैद्यनाथ देवल कमिटीतर्फे मंदिराच्या पायर्यावर लोखंडी बॅरीकेटिंग लावून महिलांसाठी व पुरुष शिवभक्तांसाठी वेगळ्या रांगा केले होत्या. यामुळे सर्व शिवभक्तांना अतिशय शिस्तीत प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेता आले. शिवभक्तांसाठी अत्यल्प दरात केवळ शंभर रुपयात दर्शन पासची व्यवस्था ही प्रभू वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योतीर्लिंगाचे पुराणात अनन्यसाधारण महत्व आहे. परळी पंचक्रोशीतील जिरेवाडीचा सोमेश्वर, टोकवाडीचा रत्नेश्वर, बेलंब्याचे बेलेश्वर, नाथऱ्याचा पापनाथेश्वर, पिंपळगावाचा पापदंडेश्वर, तपोवनचा महादेव, शेळगावचा भगवान विष्णू, नागापुरचा नागेश्वर, वैजवाडीचा हाकर्या पुकार्या पर्वत या पर्वतावर केदारी महाराजांची समाधी, मांडव्याचा काळभैरव, सारडगावचा केदारेश्वर, धर्मापुरीचा केदारेश्वर, मलिकार्जुन (मरळसिद्ध), घाटनांदुरचा सोमेश्वर या ठिकाणीसुध्दा शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वैद्यनाथ मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त तगडा बंदोबस्त

तैनात करण्यात आला होता. यात सुरक्षेसाठी १ पोलीस उपअधीक्षक, १ पोलीस निरीक्षक, १५ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ८७ पोलीस कर्मचारी, २१ महिला पोलीस कर्मचारी, एक दंगल नियंत्रण पथक (४० कर्मचारी), १०० होमगार्ड तैनात करण्यात आले होते. श्रावण मासानिमित्त राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या 'नाथ प्रतिष्ठाण' या सामाजिक संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी ना.धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ५ वे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व संपूर्ण मंदिरासह मुख्य गाभाऱ्यात २१ प्रकारच्या फुलांनी खास सजावट करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण महिनाभर मंदिरात च्या परिसरामध्ये ''ओम नमः शिवाय'' या मंत्राचा निरंतर जाप करणारी ध्वनी प्रणाली देखील बसवण्यात आला आहे. श्रावण सोमवारी साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचे लाडू असा प्रसादही भाविकांना नाथ प्रतिष्ठानच्या वतीने वाटप करण्यात आले. यावेळी नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन कुलकर्णी, युवा नेते अमित केंद्रे, ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

माध्यम स्वातंत्र्यावर मोठे संकट

आणीबाणीत माध्यम स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचा प्रयत्न झाला तेव्हा आम्ही विरोध केला, १९८२ ला जगन्नाथ मिश्र यांनी बिहार प्रेस बिल आणले त्याविरोधात आम्ही तुरूंगात गेलो.

आता पुन्हा एकदा तशी वेळ येतेय. केंद्र सरकार डिजिटल मिडिया आणि युट्यूब चॅनल्सचा आवाज बंद करणारे ब्रॉडकास्ट बिल आणत आहे. प्रसारण सेवा नियमन विधेयक असं नाव धारण करणारया या विधेयकात युट्यूब चॅनल्सचा आणि एकूणच डिजिटल मिडियाचा गळा घोटण्याची पूर्ण तजविज करण्यात आलीय. ३० वर्षापुर्वी आलेल्या केबल टीव्ही नेटवर्क ॲक्टींगची जागा हे विधेयक घेणार आहे म्हणे. या कायद्याचा फटका डिजिटल मिडिया, सोशल मिडिया, ओटीटी प्लॅटफॉर्म, वैयक्तिक कंटेंट क्रियेटर अशा सर्वांना बसणार आहे.. तुमचं युट्यूब चॅनल नसेल मात्र तुम्ही बातमीशी निगडीत कंटेंट इन्स्टावर, ट्यूटरवर टाकत असाल आणि ते सरकारला आक्षेपार्ह वाटत असेल तर तुमचा आवाजही बंद केला जाऊ शकतो.. तुमच्या घरावर धाड टाकून सारं साहित्य जप्त केलं जाऊ शकतं.. चॅनल बंद करून तुम्हाला अटकही होऊ शकते.. देशाची एकता, एकात्मता, सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी हा कायदा केला जातोय असं तद्र चुकीचं समर्थन सरकारतर्फे केलं जातंय. मात्र हे खरं नाही डिजिटल मिडियाचा सरकारनं धसका घेतलाय हे वास्तव आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपची जी वाताहत झाली त्याला सोशल आणि डिजिटल मिडिया जबाबदार आहे हे मोदी - शहांचं आकलन आहे.. त्यातून दोघे डिजिटलवर संतापले आहेत. पंधरा वीस भांडवलदारांच्या हाती एकवटला आहे.. माध्यमांच्या या एकाधिकारशाहीमुळे सरकारचं काम सोपं झालं.. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिन्ट मिडियाला गोदीत घेऊन त्यांचा आवाज बंद करण्याचं काम सरकारनं केलं.. गोदी मिडियानं निवडणूक काळात आणि नंतरही आपल्या मालकांची इमानेइतबारे सेवा केली. मात्र डिजिटल मिडिया? डिजिटल मिडियानं सरकारची सारी पोलखोल केली. राहूल गांधींच्या दोन्ही यात्रा असतील, खेळाडू मुलींचं आंदोलन असेल, शेतकऱयांचा दिल्ली घेराव असेल, किंवा १४६ खासदारांचं निलंबन असेल या सर्व घटनांकडे मुख्य प्रवाहातील माध्यमांनी दुर्लक्ष केलं.. नरेंद्र मोदींचा अहंकार आणि अमित शहांची अरेरावी गोदी मिडियानं जगासमोर येऊ दिली नाही.. हे सारं डिजिटलमुळं जगाला कळलं. प्रेक्षक आणि वाचक मोदी दर्शन आणि मोदी महिमा ऐकून गोदी मिडियाला कंटाळले होते. अनेकांनी टीव्ही चॅनल्स पाहणं बंद केलं. त्यांनी आपला मोर्चा मग युट्यूब चॅनल्सकडे वळवला.. त्यामुळे रवीशकुमार, पुण्यप्रसून वाजपेयी, ध्रुव राठी, अभिसार, संजय शर्मा, निखिल वागळे यांच्या युट्यूब चॅनल्स चे

सबस्क्रायबर कोटीत गेले.. त्यांच्या माध्यमातून लोकांना दुसरी बाजू कळू लागली.. रवीशकुमार जे बोलतात ते लोकांना आवडायला लागलं.. लोकांवर त्यांचा प्रभाव पडायला लागला. हे सारं सरकारच्या डोळ्यात खुपणं अगदीच स्वाभाविक होतं.. त्यातून या माध्यमाचा गळा घोटण्याची योजना पुढं आली.. देशभर पसरलेल्या डिजिटल मिडियाला मॅनेज तर करणं शक्य नव्हतं.. त्यामुळं कायद्यानंच या माध्यमाचा ''बंदोबस्त'' करण्याचा कट रचला गेला.. विधेयकाचा मसुदा तयार झाला आहे. हे विधेयक कोणत्याही क्षणी संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडलं जाऊ शकतं. या विधेयकाला सर्वच विरोधी पक्षांनी विरोध केला आहे. पण हे विधेयक मंजूर झालं तर काय होईल..? बघा मी काय बोलायचं? किती बोलायचं? आणि आपण काय ऐकायचं? हे सरकार ठरवणार आहे. हे विधेयक माध्यमांसाठी आणीबाणी आणि बिहार प्रेस बिला पेक्षाही जास्त हानीकारक असलयानं केवळ पत्रकारच नाही तर लोकशाही प्रेमी आणि माध्यम स्वातंत्र्याबद्दलची चाड असणारया सामांन्य जनतेनं ही विधेयकास विरोध केला पाहिजे.. बिहार प्रेस बिलाच्या वेळेस जनता पत्रकारांबरोबर होती त्यामुळे बिहार सरकारला ते काळे विधेयक मागे घ्यावे लागले.. या ब्रॉडकास्ट नावाच्या काळ्या विधेयकाच्या विरोधातही जनतेनं आम्हाला साथ दिली पाहिजे. असं झालं नाही तर ''गोदी जनता'' हा नवा वाक्प्रचार तयार होईल. हे विधेयक डॉ. आंबेडकरांनी आम्हाला दिलेल्या विचार स्वातंत्र, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाच गळा घोटणारे आहे.. याचा फटका सामांन्य जनतेलाही बसणार आहे..या विरोधात इतर संघटनांना सोबत घेत मराठी पत्रकार परिषद, डिजिटल मिडिया परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आवाज उठविणार आहेच. जनतेचा आवाज बंद करण्याच्या सरकारी कटाच्या विरोधात आम्हाला तुम्हा सर्वांची साथ हवी आहे..

एस.एम. देशमुख

पान १वरून...

राज ठाकरेंना टाडा लावून

आधी प्राधान्य द्या आणि उरल्या तर बाहेरच्यांना बोलवा असे मी आधीपासूनच सांगत आहे,'' असे राज ठाकरे म्हणाले. प्रकाश आंबेडकर यांना राज ठाकरेंच्या या विधानाबद्दल विचारण्यात आले असता ते म्हणाले की, ''राज ठाकरेंवर टाडा, कोटा लागला पाहिजे. समाज दुंभगणारे हे विधान आहे. सरकारने मागे पुढे न पाहता अशांना सरळ आत टाकून मोकळे झाले पाहिजे, असे आंबेडकर म्हणाले.

नैसर्गिक आपत्तिसाठी आता

अवेळी पाऊस, गारपीट, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण आणि आकस्मिक आग यासारख्या स्थानिक आपत्तींमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनाही ही मदत मिळेल. नैसर्गिक आपत्तिमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळेल. कृषी क्षेत्राला चालना मिळून शेतकरी नुकसानीची भीती न बाळगता शेती करण्यासाठी प्रोत्साहित होतील. आर्थिक स्थिरता शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. राज्य सरकारचा हा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा असून, या निर्णयामुळे शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलमध्ये राडा

समाजाच्या कार्यकर्त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हॉटेल परिसरात गोंधळ उडाला होता. मनसैनिक कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न करत होते. यावेळी मराठा आंदोलकांनी मनोज जरांगे पाटील तुम्ही आगे बढो, हम तुम्हारे साथ है, अशी घोषणाबाजी देखील केली आहे.

विजेच्या धक्क्याने ९

रविवारी रात्री मुलं जलाभिषेकासाठी बाहेर पडली होती. या मुलांनी प्रवासासाठी ट्रॅक्टर-ट्रॉलीवर डीजेचीही व्यवस्था केली होती. या गावातील रस्ता खराब असल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीचा रस्त्यावरून जाणाऱ्या हाय टेंशन लाईनला धक्का लागला. विद्युत प्रवाहामुळे ट्रॉलीत बसलेल्या मुलांना विजेचा धक्का बसला. यामुळे ९ जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच पोलिस दाखल झाले. यावेळी स्थानिकांनी विद्युत विभागावर गंभीर आरोप केले. वीज विभागाचा निष्काळजीपणा अपघाताला कारणीभूत ठरल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून अपघातानंतर सातत्याने माहिती देऊनही वीज विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. पोलिस आणि प्रशासकीय अधिकारी आल्यानंतरही रात्री उशिरापर्यंत मृतदेह घटनास्थळीच होते.

तुम्ही फडणवीसांची सुपारी घेतली,

टार्गेटवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कायम राहिलेत. त्यांना उत्तर देण्यासाठी भाजपचे प्रमुख नेते पुढे सरसावतात. यावेळी आणखी एक भाजपचे ज्येष्ठ नेते थेट जरांगेंच्या निशाण्यावर आहे. मनोज जरांगे म्हणाले, नारायण राणेंनी मराठा समाजाच्या बाजूने बोलावे. मला धमकी देऊ नका, मी गोरगरिबांसाठी काम करतो. राणे कुटुंबियांबद्दल मी काहीच बोललो नाही, देवेंद्र फडणवीस यांच ऐकून ते मला बोलत आहेत, तुम्ही देवेंद्र फडणवीसची सुपारी घेतली. मी देवेंद्र फडणवीसला मोजत नाही. मराठा समाजाने चांगले चांगले पाया खाली चिरडले आहेत, तुम्ही कोण आहात?, असे जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांनी फडणवीसांवर बोलू नये असे नारायण राणे यांनी म्हटले होते. त्याला जरांगे यांनी उत्तर दिले.

दूध भेसळखोरांवर मोक्का

दोन्ही उपमुख्यमंत्री आणि दुग्धविकास मंत्र्यांना करणार असून.अशा भेसळखोरांना आता गावकऱ्यांनी विष कालवे कालवे'' ही पदवी बहाल करावी असा उपरोधिक टोला माजी मंत्री सुरेश धस यांनी लगावला ते पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. रविवारी कडा परिसरात झालेल्या भेसळखोरांवर कडक कारवाई व्हावी.यासह मुख्य आरोपी असलेल्या व्यक्ती कडून जे जे म्हणून लोक यात सहभागी आहेत त्यांना सह आरोपी करावे.मुख्य आरोपीचे मोबाईल कॉल रेकॉर्ड याचे डिटेल्स चेक करून ज्यांनी ज्यांनी यांच्याकडून हा माल नेलेला आहे अशांवर देखील कडक कारवाई करावी.संबंधित भेसळखोराकडे कोट्यवधीची मालमत्ता कुठून आली ? याचाही शोध घ्यावा.शिवाय या लोकांना मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्यास चाप बसेल जेणेकरून असले प्रकार राज्यातील थांबतील.आणि राज्य सरकारला ५ रुपये अनुदान देखील देण्याची आवश्यकता लागणार नाही.आणि शेतकऱ्यांच्या दुधाला देखील ४० रुपये लिटर दर मिळू शकेल याबाबत

राज्य सरकारने सर्व्हे करावा...

संपूर्ण राज्यातील दूध देणारी जनावरे यांची संख्या किती ?कोणत्या गावचे किती लिटर दूध आहे ? याचा सर्व्हे राज्य सरकारने करावा जेणेकरून यातून खरी माहिती पटलावर येईल.आणि भेसळखोरांना आळा बसेल असेही सुरेश धस शेवटी म्हणाले.

दिल्लीतील कोचिंग

इच्छुकांचा जीव धोक्यात घालत आहेत. दिल्लीच्या जुन्या राजिंदर नगरमधील कोचिंग सेंटरच्या तळघरात पुराचे पाणी घुसल्याने उत्तर प्रदेशातील श्रेया यादव (२५), बिहारमधील तान्या सोनी (२५) आणि केरळमधील नेविन डेल्विन (२४) यांचा बुडून मृत्यू झाला होता. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, विविध कोचिंग संस्थांमधील विद्यार्थ्यांनी वाढीव सुरक्षा उपायांची मागणी करत निदर्शने सुरु आहेत. दरम्यान, तीस हजारी न्यायालयाने त्या तळघराच्या सहमालकांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

ट्रकला आग : खंडीभर

आल्यानंतर त्याने गाडी थांबवली. ट्रक जळत असल्याचे तेथील काही नागरिकांच्या आणि येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आतील शेळ्या- मेंढ्या बाहेर काढल्यामुळे काही शेळ्या-मेंढ्या वाचल्या. यात ट्रकचेही मोठे नुकसान झाले. सदरील ट्रकला आग कशी लागली? हे मात्र समजू शकले नाही. या जळीत घटनेत संबंधित व्यापाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दरम्यान या ट्रकमध्ये १७० शेळ्या-मेंढ्या होत्या अशी माहिती आहे.

आयशर-दुचाकीच्या अपघाता पती ठार

कुंभारपिंपळगाव येथे नव्यानेच या शैक्षणिक वर्षापासून चालू केलेल्या सन-साईन इंग्लीश स्कुलचे वर्ग संपवून आपल्या पत्नीसह दुचाकीवरुन घनसावंगीकडे जात असतांना सिंदखेड गावाच्या जवळ घनसावंगीकडून येणाऱ्या मालवाहू आशयर (एमएच-२०-जीसी-३२५८)ची समोरा-समोर धडक झाल्याने दुचाकीवरुन जाणारे उमेश जैवळ (३८) हे जागीच ठार झाले तर त्यांच्या पत्नी अश्विनी जैवळ या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर प्राथमिक उपचार घनसावंगी येथील ग्रामीण रुग्णालयात करुन पुढील उपचारासाठी जालना येथे हलविण्यात आले आहे. हा अपघात एवढा भीषण होता की दुचाकीचे समोरील चाक ही निखळून पडले होते. कुंभारपिंपळगाव येथे अल्पवधीतच उमेश जैवळ यांचा मित्र परिवार मोठा केला होता. त्यांच्या अकाली अपघाताने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ६ ऑगस्ट २०२४

इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील परदेशी शिष्यवृत्तीस मुदतवाढ

बीड : जिल्हयातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुलामुलींना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२४- २५ साठी विद्यार्थ्यांना दि. १५ जून २०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.सदर योजनेस जाहिरातीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची मुदत दि. ३० जून २०२४ रोजी पर्यंत देण्यात आली होती. तथापी सदर योजनेस मिळालेला प्रतीसाद विचारात घेता दि. १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी परदेशी शिक्षण घेणा-या इच्छुक विद्यार्थी यांनी संचालक मागास बहूजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे येथे अर्ज सादर करुन शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे संचालक, एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

केवळ बुकलेट वाचून आ.आजबे यांनी सबस्टेशन्स आणि ट्रान्सफर मंजुरी बाबत जनतेची दिशाभूल केली

अद्याप केंद्र शासनाची मान्यता नाही, जनतेची माफी मागा, माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचा पलटवार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विजेचा प्रश्न मार्गी लागला ९ सब स्टेशन्स आणि६६८ ट्रांसफार्मर मंजूर केल्याचा आव आ.बाळासाहेब आजबे यांनी आणला ही जनतेची शुद्ध फसवणूक आणि दिशाभूल असून आपण कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे त्याचे पत्र दि..११नोव्हेबर २०२३ रोजी दिलेले आहे आणि त्याचा पाठपुरावा केलेला आहे मात्र जी योजना अद्याप केंद्र शासनाने मंजूर केलेली नाही केवळ त्याचे बुकलेट मधील नावे वाचून मंजुरीच्या बातम्या दिल्यामुळे मला त्यांच्या बुद्धीची किंवा येते त्यांनी जनतेचे माफी मागावी असा पलटवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला .

दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी आष्टी मतदार संघाचे आमदारांनी ९ वीज सबस्टेशन्स आणि ६६८ ट्रान्सफॉर्मर्स मंजूर करून विजेचा प्रश्न सोडवला आशा बातम्या आणि वर्तमानपत्रात जाहिराती देऊन आणि सोशल मीडियावर बातम्या पसरवून..सत्कार करून घेऊन स्वतःची बडवून घेतली आहे. हे सर्व पाहता मला त्यांच्या बुद्धीची कीव येते.. हे म्हणजे उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग अशी त्यांची अवस्था झाल्याची दिसून


आ. सुरेश धस
विधानपरिषद सदस्य
२९ उस्मानाबाद तथा लातूर, बीड स्थानिक प्राधिकारी मतदार संघ
E-mail :- sureshdhas@gmail.com
महाराष्ट्र विधानपरिषद
कार्यालय दूरध्वनी/फैक्स. (०२४१) २६२०१४
जावक क्र. ०३६८/२०२३
दिनांक २२/०८/२०२३
प्रति,
मा.कार्यकारी अभियंता,
महावितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय,
बीड
सप्रेम नमस्कार...!
विषय : आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील ... सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत.. कामांना मंजुरी मिळणे बाबत...
महोदय,
उपरोक्त विषयी विनंती की,
माझा मतदार संघातील.. बीड जिल्ह्यातील.. आष्टी पाटोदा आणि शिरूर (का) तालुक्यातील... गावांत २३/११ के.व्ही. सीव उपकेंद्र मंजूर करणे आवश्यक आहे.
आष्टी तालुक्यातील..
गावेगव १) आष्टी ट्रांसफार्मर २) नागतुळी ३) कोळवाडा ४) ओपोला ५) नागापूर
पाटोदा तालुक्यातील.. धनगर जवळका १) धनगाव पुनरा २) पारगाव घुमरा ३) सौताडा
शिरूर कासार तालुक्यातील.. १) शिरूर क
पारगावेगव.. ग्रामपंचायतीत ५ एम.व्ही.ए. जनरेशन पावर ट्रांसफार्मर सह आणखी एक, ५ MVA पावर
ट्रांसफार्मर बसवणे आवश्यक आहेत.. त्यापुरावा.
आष्टी तालुक्यातील.. १) पोखरी २) शिराळ ३) धानोरा ४) दौलावडगाव ५) टाकळी अमिया
पाटोदा तालुक्यातील.. १) रोहतवाडी २) मोरेवाडी ३) कुसळंब
तसेच आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यामध्ये नवीन ५, मोठ्याचे लगत करणे, ६०० क्षमतेचे ५५८ नवीन ट्रांसफार्मर चा पुरवठा करणे, सद्यस्थितीत १४५ ठिकाणी ६३ क्षमते ऐवजी १०० क्षमता असलेले ट्रांसफार्मर बसवणे.. ११ के.व्ही. बीम चालवी ३२१ कि.मी.लाइन करणे, ३३/११ सब स्टेशन साठी ३८ कि.मी.बीम चालवी लाइन करणे.. ही विनंती
आपला.
महाराष्ट्र.. आष्टी, पाटोदा तालुक्यातील.. शेतकऱ्यांचे वीज प्रश्नासाठी पुरेसा दाबाने अपेक्षा समाधानकारक वीजपुरवठा करावा यासाठी.. प्रयत्नात असूनही पाठपुरावा करणेबाबत पत्र
सौ. विनंती
सोबती
(सुरेश धस)
प्रति,
मा. श्री. राजेश टोपे साहेब, पालकमंत्री बीड, म.आष्टी, जि.बीड. ४१४२०३ महाराष्ट्र

येते आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विजेचा गंभीर प्रश्न पाहता आपण सुधारित वितरण क्षेत्र योजना (आर डी एस एस) अंतर्गत या सर्व कामांना मंजुरी मिळावी यासाठी आपण प्रस्ताव दाखल करून त्यासाठी पत्र दिलेले आहे यामध्ये काही कच्चा आराखडा होता त्यामध्ये काही बदल आवश्यक होते.दादेगाव, पारोडी, बीडसांगवी, मातकुळी, कोयाळ, जामगाव, अंभोरा, पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका, पारगाव घुमरा सौताडा, शिरूर कासार तालुक्यातील शिरूर कासार इतकेच नक्की होतील एवढे मी सुचवले होते त्यापैकी दादेगाव हे पूर्वीच्याच महावितरण योजनेत मंजूर होते मात्र जागे अभावी ते राहिले होते पारगाव घुमरा या ठिकाणच्या शेतकऱ्यांना सन २०१४ सालीच भूसंपादनाचे पैसे दिलेले आहेत या ९ वीज उपकेंद्रांचा प्रस्ताव पुढे पाठवला तसेच सद्यस्थितीमध्ये ५ एम व्ही ए क्षमतेच्या पावर ट्रांसफार्मर सह आणखी ५ ट्रांसफार्मर आष्टी, पोखरी, शिराळ, धानोरा, दौलावडगाव, टाकळी अमिया पाटोदा तालुक्यातील रोहतवाडी आणि शिरूर तालुक्यासाठी फिडरवे तयार करणे यासह सद्यस्थितीत१७५ ठिकाणी ६३ क्षमतेच्या ऐवजी १०० क्षमतेचे ट्रांसफार्मर बसवणे ३३/११ सब स्टेशन साठी एकूण ३८ किलोमीटर वीज वाहिनी तयार करणे, या कामांसाठी कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांच्याकडे पत्र व्यवहार केला आहे मात्र विद्यमान आमदारांनी कशाचीही शहानिशा करतात केवळ आमदारांना देण्यात येणाऱ्या बुकलेटमध्ये नावे वाचली आणि मंजुरी मिळाल्या बाबतच्या बातम्या दिल्या आणि जाहिराती प्रसिद्ध करून स्वतःचीच बडवून घेतली. वास्तविक पाहता सुधारित वितरण केंद्र योजना (आर डी एस एस) अंतर्गत आधुनिकीकरण या विभागात नवीन उपकेंद्र क्षमता वाढ या योजनेस केंद्र शासनाची अद्यापही मंजुरी मिळालेली नाही. आमदार महोदयांनी १९ जुलै २०२३ रोजी निविदा प्रसिद्ध झालेल्या महावितरण कंपनीने फेज वन ही योजना त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निविदे मध्ये वाचावी आमदार महोदयांनी धडधडीत चुकीचे स्टेटमेंट केले आहे छत्रपती संभाजी नगर रिजन मधील लातूर अंतर्गत बीड लातूर आणि धाराशिव हे विभाग आहेत त्यामध्ये लातूर धाराशिव सोडता बीड जिल्ह्यातील एकही काम मंजूर नाही त्यामुळे आमदारांनी चुकीची माहिती देऊन जनतेची दिशाभूल आणि फसवेगिरी करू नये त्यांनी गोरगरीब जनतेची माफी मागावी अशी आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

यशवंत ग्राम समृद्धी योजनेतील रक्कम पतीच्या नावे उचलली! सदस्य अपात्र

जालना । प्रतिनिधी

यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातील रक्कम पतीच्या नावे उचलून पदाचा दुरूपयोग केल्या प्रकरणी देवडे हादगाव ता.घनसावंगी येथील निर्मला अंकुश देवडे यांचे ग्रामपंचायत सदस्य पद जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरवले आहे.

जानेवारी - २०२१ मध्ये देवडे हादगाव च्या ग्रामपंचायत सदस्य पदी निर्मला अंकुश देवडे यांची निवड झाली होती. त्यांनी पदाचा गैरवापर करत यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातील ३,००० रूपये रक्कम उचलून आर्थिक लाभ घेतल्या बाबत अण्णा बॉस देवडे, श्रीराम देवडे व सिद्धेश्वर देवडे यांनी विलास भुतेकर यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांच्या न्यायालयात विवाद अर्ज दाखल केला होता. जिल्हाधिकाऱ्यां समक्ष झालेल्या सुनावणी दरम्यान विलास भुतेकर यांनी सक्षमपणे बाजू मांडताना ग्रामपंचायत सदस्या निर्मला देवडे यांनी पदाचा दुरूपयोग करत यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातून पतीच्या नावे दि. २७ ऑगस्ट २०२१ रोजी ३,००० रूपये उचलून सदरील रकमेचा स्वतःस आणि कुटुंबियांना आर्थिक लाभ करून घेतला. असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ , कलम १४ (ग) चे उल्लंघन केल्याची बाब ड. विलास भुतेकर यांनी पुराव्यानिशी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सादर झालेले पुरावे, आणि ग्रामपंचायत च्या महाराष्ट्र बँक घनसावंगी शाखेतील खाते उतारा यांचे अवलोकन करून निर्मला अंकुश देवडे यांचे सदस्यत्व रद्द ठरवले.

दिंद्रुड : येथील भगवान वाघ यांचे नुकतेच आकाली निधन झाले.माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे ओबीसी नेते माधव निर्मळ यांनी वाघ कुटुंबाची सोमवारी भेट घेत सांत्वन केले.

पान १वरून...

महान गायक किशोर कुमार

यावेळी या स्वरांजली कार्यक्रमात सुभाष शेप, डॉ राजेश इंगोले, डॉ संदीप जैन, डॉ देवराव चामनर, डॉक्टर बैरागी,मयुरी मजगे, ऐश्वर्या जैन, अमोल शेपसह अनेक स्थानिक गायकांनी किशोरदा यांची गाणी गाऊन किशोर कुमार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण मोरे ,मिलिंद मस्के, विद्युत खोबरे ,प्रदीप बनसोडे ,राहुल हातागळे.. वर्धमान डोले.. विश्वजित खोगरे, यशवंत सरोदे, खदीरभाई फुलवाले.आशिष बडे, कैलास गांधले आदींनी परिश्रम घेतले.

नवनियुक्त अधिकारी

प्रगती करत रहावी, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेभाऊ गुजर, उपाध्यक्ष युवराज बहिरवाळ यांच्यासह कार्यकारिणीकडून सत्काराचे आयोजन केले होते. सूत्रसंचलन सचिन जगताप यांनी केले. प्रास्ताविक रा.काँ.चे शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर यांनी केले. यावेळी उबाठा गटाचे शिवसेना जिल्हा संघटक रतन गुजर, सर्जेराव खटाणे, अर्जुन बहिरवाळ, बबन बहिरवाळ, बबन चौधरी, सरपंच सुभाष बहिरवाळ, गणेश बहिरवाळ, पशुसंवर्धन अधिकारी पंकज बहिरवाळ, रमेश येवले, सरपंच महादेव नेहराळे, वनपाल आनंद बहिरवाळ, योगेश बहिरवाळ यांच्यासह पदाधिकारी, समाजबांधव उपस्थित होते.

माणसात जन्मलो म्हणून तरी

ज्यांना दुसऱ्याशी काहीच देणे घेणे राहिलेले नाही अशा लोकांना माझे नम्र विनंतीपूर्वक आव्हान आहे की आपण या जगात माणूस म्हणून जन्मलो आहोत म्हणून तरी मानवतेची सेवा केलीच पाहिजे असे मनोगत खुर्शीद आलम यांनी व्यक्त केले आहेत, यावेळी नगरसेवक संजय उडान यांनी या तिन्ही सत्कारमूर्तीचे कौतुक केले आहे तर या तिन्ही सत्कार मुर्ती यांनी आपापले मनोगत व्यक्त करताना म्हणाले आहे की आम्ही जे सेवा केली आहे आणि करत आहोत हे कुठेच थांबणार नाहीत समाजाचे आमच्यावर हक्क अधिकार आहेत समजुन म्हणून आम्ही जनतेसाठी सदैव तत्पर आणि तैय्यार आहोत आणि राहणार आहोत असे मत व्यक्त केले आहे, यावेळी विशेष उपस्थितांमध्ये शेख उस्मान भाई,ऑल इंडिया ओबीसीचे जिल्हाध्यक्ष रफिक बागवान,अमोल अहिरे, सखारामजी शिंदे,संपादक पठाण अमर जान,अशोक दुधाळ,जावेद चौधरी,मठकरी मॅडम,मोहम्मद इफ्तेकार,शेख खलील,मोहसीन राज,अल्ताफ भाई,सैय्यद फहीम,सलीम चेअरमन,रफिक भाई,मोमीन शहेबाज,मोहम्मद जिशान,बाबु भाई,सादिक मोमीन,शेख मोहसीन,मुक्तार भाई, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते,सुत्रसंचालन नितीन भोसले यांनी तर जाणता राजा युवामंच चे संस्थापक अध्यक्ष महेश शिंगण यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले आहे,

महिला मराठा कृती गटाने

काही दिसले नाही, भेटवस्तूमध्ये मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आणि प्रतिमा एवढेच काय ते, तसेच जेव्हा आदरणीय जरांगे वहिनींची भेट घेतली तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी होते आणि आनंदही होता. पती बद्दल लोकांच्या भावना त्यामुळे त्यांचा अभिमानाने उर भरून येत होते. सर्व महिलांना देखील त्या ठिकाणी गहरून आले होते याप्रसंगी विविध जिल्ह्यातून आलेले बंधू आणि भगिनी यांची देखील भेट घेऊन पुढील दिशा बाबत संवाद साधला.

बाल आरोग्य तपासणी

या शिबिरादरम्यान डॉ. पूनम शिंदे (सहयोगी प्राध्यापिका बालरोग विभाग), तसेच पदव्युत्तर बालरोग विभागातील डॉ. सचिन गायकवाड, डॉ.कोमल शिंगणे ,डॉ.रिचा साठे डॉ. शिल्पा सिरस्कर आणि आंतरवासियता प्रशिक्षणार्थी विद्यार्थी रोशन राठोड, मयंक यादव, केतन सोमवंशी, शितल तुपे, स्नेहल शिंदे यांनी ३७१विद्यार्थ्यांची व ९२ ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून मोफत होमिओपॅथीक औषधोपचार केले.अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली व सर्वांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे सांगितले.सदर शिबीर एस. के. एच. वैद्यकीय महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगारकर आणि बालरोग विभाग प्रमुख डॉ.एम.डी.आगे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. या शिबीराचे सूत्रसंचालन श्री. देशमाने आर. वाय.आणि आभार प्रदर्शन श्री भरणे बि .आर.यांनी केले.

धर्म परिवर्तन कर म्हणून पोलीस असलेल्या पत्नीचा छळ

आष्टी पोलिसात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव टाकून पोलीस खात्यातील पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केला, तसेच पैसे दे नाहीतर तलाक दे असे म्हणून नंतर परस्पर दुसरे लग्न केल्या प्रकरणी आष्टी येथील व्यावसायिकाच्या मुलासह कुटुंबातील सातजणांवर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यावरून पती सोहेल लैकुद्दिन काजी, सासरा लैकुद्दिन मोहम्मद काझी, सासू रझियाशाहिन लैकुद्दिन काझी, चुलत सासू राफियाशाहिन काझी (राणाबाजी), नणंद आफिया काझी व मेहविश काझी तसेच पतीची दुसरी पत्नी आयशा शेख (सर्व रा. शनीचौक, आष्टी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ता. ११ ऑक्टोबर २०१८ रोजी स्पेशल मॅरेज ॲक्ट या कायद्यानुसार आमचा विवाह झाला. त्यावेळी मी माझ्या धर्माने राहणार व ते त्याच्या धर्माने राहणार असे ठरले होते. लग्नाच्या काही दिवसापर्यंत पती माझ्यासोबत धर्माच्या बाबतीत काही बोलला नाही. परंतु नंतर धर्मावरून छळ करण्यास सुरुवात केली. सोहेल हा सिदपूर (गुजरात) येथे बँकेत नोकरीस होता, तर फिर्यादी या नागपूर येथे पोलीस विभागात नोकरीस होत्या. बँकेतील अफरातफरीच्या प्रकरणात पतीला १३ सप्टेंबर २०२१ रोजी सस्पेंड करण्यात आले. त्यावेळी आम्ही दोघे गुजरात येथे राहत होतो. ऑक्टोबर २०२१ रोजी मुलगा झाला. त्यानंतर पती कोणत्या ना कोणत्या कारणावरुन नेहमी भांडणतंटा करू लागला. प्रसूतीच्या सहा दिवसानंतर मला मारहाण केली. मे २०२२ मध्ये पतीच्या नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी सासरा, सासू, नणंद सर्वजण आष्टीतून गुजरात येथे आले. तेथे तू मुस्लिम नसल्याने आमच्यामध्ये राहू शकत नाही. त्यामुळे तुला आम्ही मान्य करणार नाही अशा नेहमी धमक्या देत असत. लेकरु जरी झाले तरी मी तुझा संसार होऊ देणार नाही. तू मला कधी मान्य नाहीस आणि मी तुझा घटस्फोट होण्यास भाग पाडेल. तू माझ्या मुलाला सोड असे म्हणून सासूने अश्लील शिवीगाळ केली. तू हिला सोडून दिले नाही तर तुला आम्ही प्रॉपर्टी देणार नाही व घरातून बेदखल करु अशा धमक्या कुटुंबीय पतीला देत असल्याने त्यांच्या सांगण्यावरून पती भांडण व मारहाण करीत असे. त्यामुळे दोघे विभक्त राहू लागले. एक-दोन वेळेस दोघांमध्ये समेटाचे प्रयत्न झाले. परंतु पतीच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. सासू-सासरे नेहमी तुला आमच्या मुस्लिम रितीरिवाजाप्रमाणे राहावे लागेल. तुला मुस्लिम धर्म स्वीकारावा लागेल. तू असे केले नाहीस तर आम्हाला तू मान्य नाहीस. तू धर्म परिवर्तन केले नाही तर तुला आमच्या घरात तसेच माझ्या मुलाच्या आयुष्यात स्थान नाही व तुला माझ्या मुलाला तलाक द्यावा लागेल अशी धमकी देून मानसिक व शारीरिक त्रास देण्यास सुरुवात केली.त्यात नोकरीला आहेस तर मी तुझ्या नोकरीवर गदा आणेन. तुझ्या मागे चौकशी लावेन. मी सस्पेंड झाल्यामुळे तुलाही सस्पेंड करेन. तुला सुखाने जगू देणार नाही व जर तू माझा धर्म स्वीकारला नाही तर मी तुला तलाक देईन. माझ्या धर्मात चार लग्न करण्यास परवानगी आहे. त्यामुळे मला तुझी गरज नाही तसेच वारंवार पैशाची मागणी करुन पैसे दे नाहीतर तलाक दे असे म्हणून छळ केला, तसेच फिर्यादीच्या परस्पर दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी आयशा शेख हिच्याशी लग्न केले असे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून सातजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१ ऑगस्टपर्यंत २७,०५,२१० कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदी प्रशासनाने तपासल्या

बीड । प्रतिनिधी

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी - मराठा यांच्या १ ऑगस्ट २०२४ पर्यंत बीड जिल्हा प्रशासनाकडून एकूण २७,०५,२१० नोंद तपासण्यात आलेल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने २४ ऑक्टोबर २०२३ पासून १ ऑगस्टपर्यंत एकूण २७,०५,२१०, नोंदी तपासण्यात आल्या. जिल्हयामध्ये २१,९०७ आतापर्यंत एकूण कुणबी नोंदी सापडल्या. जिल्हयात ५२१ गांवामध्ये कुणबी नोंदी सापडल्या. त्यापैकी ४६७ गांवाची संख्या प्रसद्धि करण्यात आलेली आहे.

बीड तालुक्याची कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा बाबतच्या नोंदी खालील प्रमाणे

बीड तालुक्यात तपासलेल्या नोंदींची एकूण संख्या ३,९२,२१७, एकुण कुणबी नोंदींची संख्या ३०६१, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या ९८, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या ९८ इतकी आहे. गेवराई तालुक्यात तपासलेल्या नोंदींची संख्या ३,२८,०१४, एकुण कुणबी नोंदींची संख्या ४३७५, कुणबी नोंद सापडल्या गावांची संख्या १२२, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या १२२ इतकी आहे. शिरूर-कासार तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या १,१७,६२९ एकुण कुणबी नोंदींची संख्या ३५२ कुणबी नोंद सापडल्या गावांची संख्या १५, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या १४ इतकी आहे. पाटोदा तालुक्यात तपासलेल्या नोंदींची संख्या १,३४,६५१ एकुण कुणबी नोंदींची संख्या ९०६, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या २२, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या २२ इतकी आहे.आष्टी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या २,९९,१०६, कुणबी नोंदींची संख्या ५१९९, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या ६०, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या ३२ येवढी आहे. माजलगाव तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या ४,००,२१३, एकूण कुणबी नोंदीची संख्या २२००, कुणबी नोंद सापडलेला गावांची संख्या ५१, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या ५६ इतकी आहे. धारूर तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या १,८८,३७४, एकुण कुणबी नोंदींची संख्या ८१७, कुणबी नोंद सापडलेला गावाची संख्या २३, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या १० इतकी आहे. वडवणी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या ७८,२५५ एकूण कुणबी नोंदींची संख्या १०३२, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या ३१, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या १८ इतकी आहे. अंबाजोगाई तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या १,०१,३९०, एकूण कुणबी नोंदींची संख्या ७१६, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या २६, त्यापैकी यादी प्रसिद्ध केल्या गावांची संख्या २५ इतकी आहे. केज तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या ३,५०,०७८ एकूण कुणबी नोंदींची संख्या २६३०, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या ५५, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या ५४ इतकी आहे.

परळी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या ३,१५,२८३, एकूण कुणबी नोंदींची संख्या ६१९, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या १८, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या १६ केलेली आहे. २४ ऑक्टोबर २०२३ पासून कुणबी, कुणबी-मराठा व मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांच्या तपशीलानुसार १०,६,३३६ जात प्रमाणपत्रांची अर्जांची संख्या असून आतपर्यंत ९८१७३ नागरीकांना जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. ५७ नामंजूर अर्ज असून ८१०६ इतके प्रलंबित अर्ज आहेत. प्रलंबित अर्जांपैकी ४३८१ अर्ज त्रुटीमध्ये आहेत. प्रलंबित व त्रुटी अर्जांवर कार्यवाही करण्याची दक्षात घेण्यात येत आहे. यासंदर्भातील तालुका निहाय माहिती खालील प्रमाणे दिली आहे.बीड तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या २२,३८९ असून निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या १८,७८६, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या ३६०३ इतकी आहे. गेवराई तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या १८,५७०, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या १६,०५९, नामंजूर संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या २५११ इतकी आहे. शिरूर कासार तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या ६०५६, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या ५३५९, नामंजुर अर्ज संख्या एकही नाही. प्रलंबित अर्जाची संख्या ६९७ इतकी आहे. पाटोदा तालुक्यात जात प्रमाणपत्र संख्या १०,४५७, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या १०,२६६, नामंजूर अर्ज संख्या २७, प्रलंबित अर्जाची संख्या १६४ इतकी आहे. आष्टी तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या १४,९४४, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या १४,८३१, नामंजूर अर्ज संख्या २०, प्रलंबित अर्जाची संख्या ९३ इतकी आहे. माजलगाव तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या ६३६०, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या ६०६८, नामंजुर अर्ज संख्या २, प्रलंबित अर्ज संख्या २९० इतकी आहे. धारूर तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या ४२११, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या ३९६६, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या २४५ इतकी आहे. वडवणी तालुक्यातील जात प्रमाणपत्र अर्ज संख्या ४१७०, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या ३९२५, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही प्रलंबित अर्ज संख्या २४५ इतकी आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जात प्रमाणपत्र अर्ज संख्या ५८४०, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या ५७६९, नामंजुर संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या ७१ इतकी आहे. केज तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या १२५७०, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या १२,४८६, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्ज संख्या १०३ इतकी आहे. परळी तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या ७६९, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या ६५८, नामंजूर अर्ज संख्या ८, प्रलंबित अर्ज संख्या १०३ इतकी आहे.

जाहीर प्रगटन

सर्व तमात जनतेस व विशेषतः पालवण येथील जनतेस या जाहीर प्रगटणाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार अनुक्रमे १) सचिन राधाकृष्ण कुलकर्णी २) हेमलता श्रीधर मोटेगांवकर ३) सुधीर राधाकृष्ण कुलकर्णी सर्व रा. पालवण ता. जि. बीड येथील एकत्रित कुटूंबाची वडिलोपार्जित मौजे पालवण ता. जि. बीड येथील जमिन गट नंबर २००/२९३,४९१/३५६,४९०/३५७ मधील जमिनीच्या संदर्भात मा. दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) बीड यांचे न्यायालयात रे. दि.दा.क्रं.५५४/२०१५ रविंद्र विरूध्द सचिन व इतर हा प्रलंबीत असून या वादग्रस्त जमिनीच्या दाव्यातील वादी व आमचा भाऊ नामे रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी रा. पालवण ता. जि. बीड हा आमचे परस्पर व आमचे पक्षकार यांना विचारात न घेता इतरत्र लोकांना सदर विक्री करण्याचा प्रयत्नात असल्याबाबतची खात्रीलायक माहिती आमचे पक्षकार यांना मिळालेली आहे.

या जमिनीचे वाटणी पत्रक अद्याप झालेले नाही. त्यामुळे वर नमुद जमिनीच्या संबंधाने कोणीही खरेदी विक्री, व्यवहार, ईसारपावती, ताबा पावती, बक्षीसपत्र, खरेदीखत, गहाण, दान, मुख्त्यारनामा व इतर अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करू नये. जेणे करून आमचे पक्षकारांना सदरील दाव्यात पार्टी जमिन घेणाऱ्यांविरूध्द दोषारोप दाखल करण्यात येईल. त्यामुळे नमुद गटातील जमिनीशी कोणीही व्यवहार आमचा भाऊ रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी यांचेशी करू नये जे की, आमचे पक्षकार यांचे बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरील जमिनी बाबत कोर्टात प्रकरण प्रलंबीत असतांना वादग्रस्त मिळकतीबाबत प्रतिवादीचे जवळचे नातेवाईक म्हणजेच भाऊ नामे रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी हे सदर मिळकतीबाबत व्यवहार करण्याचे असे दिसत आहे. जर सदर प्रकरणात कोर्टात दावा चालु आहे. कोणी सदर वादग्रस्त गट नंबर २००/२९३,४९१/३५६, ४९०/३५७ मधील जमिनीचा कोणताच कसलाच देण्याघेण्याचा जमिन हस्तांतरणाचा व्यवहार करू नये सदर प्रकरणात जर कोणी व्यवहार केला तर त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही त्याचे वर राहील व पुढील परिणामाची जबाबदारी ही त्याची राहील. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. दिनांक :- ०४.०८.२०२४.

ठिकाण :- बीड

जाहीर प्रगटन देणार - १) सचिन राधाकृष्ण कुलकर्णी २) हेमलता श्रीधर मोटेगांवकर, ३) सुधीर राधाकृष्ण कुलकर्णी सर्व रा. पालवण ता. जि. बीड मो. नं. ८३२९४८७३१५

मार्फत - ॲड. आर. डी. सोळंके, बीड मो.नं. ९८२२५३२८५३.

दूध भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई; अजित पवाराचा इशारा

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दूध भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी कायदा केला जाणार असून दूध भेसळ करणाऱ्यांवर मोका लावला जाईल, असे संकेत दिले आहेत. पवार म्हणाले, ''राज्यात दुधात भेसळ होत आहे. दूध भेसळी विरोधात कडक कायदा केला जावा, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे. यावरून आम्ही दूध भेसळ करणाऱ्यांविरोधात कडक कायदा करावा अशी मागणी केंद्र सरकारकडे केली आहे.'' असेही पवार म्हणाले.

पुढे पवार म्हणाले, ''दूध आणि दुग्धजन्य पदार्थांत भेसळ करणाऱ्यांना फाशी द्या, अशी मागणी राष्ट्रपती यांच्याकडे केली होती. मात्र राष्ट्रपतींनी आमची मागणी मान्य केली नाही. त्यामुळे आता राज्य सरकार दूध भेसळ करणाऱ्यांवर मोका लावणार असल्याचे अजित पवार म्हणाले. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान थांबविण्यासाठी सरकारने दुधाला ५ रूपये अनुदान देण्याचा निर्णय

घेतल्याचेही अजित पवार म्हणाले.

तसेच अजित पवार यांनी सध्याच्या राजकारण आणि टीका टिप्पणीवर भाष्य करताना, मी फक्त राज्याच्या विकासावर बोलतो. कोण कोणाला काय म्हणतं याकडे बघत नाही. कोण कोणाला ढेकूण म्हणत. आता तर फक्त एकमेकांचे कपडे काढायचं बाकी ठेवले आहेत.

यामुळे विकासाकडे सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी लक्ष घालण्याची गरज असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेताना स्वतंत्र कायदा करण्याचे ठरवल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या महिन्यात सांगितले होते. तसेच राज्यातील दुधातील भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्त मोहीम प्रभावीपणे राबवावी. दोषींवर कडक कारवाई करावी, असेही निर्देश शिंदे यांनी दिले होते.

दरम्यान, राज्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांत भेसळ होत आहे. यावरून भेसळकरणाऱ्यांवर कारवाई केली जावी अशी मागणी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीकडून केली जात आहे.

कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राकडून भाताचे तीन नवे वाण विकसित

पुणे : कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने भाताची तीन नवी वाण विकसित केली आहेत. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या या कृषी संशोधन केंद्राने 'कोकण संजय', 'कर्जत १०' आणि 'ट्रॉम्बे कोकण खारा' हे तीन नवे वाण विकसित केले आहे. महत्वाची बाब म्हणजे केंद्रीय वाण प्रसारण समितीने या तिन्ही वाणांना मान्यता दिली असून पुढील हंगामापासून ही तिनही वाण शेतकऱ्यांना वितरीत करण्यात येणार आहेत. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत येथील भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे यांच्या पथका मार्फत ही तीन वाण विकसित करण्यात आली आहेत. विविध कालावधीच्या वैशिष्ट्यपूर्ण वाणांना राज्यस्तरीय वाण प्रसारण समितीने यापुर्वीच मान्यता दिली होती. आज केंद्रीय वाण प्रसारण समितीनेही या तिन्ही वाणांना अधिघोषित केले आहे.

नवीन वाण आणि त्याची वैशिष्ट्ये : कोकण संजय : हे वाण निमगरवा प्रकारातील असून, लागवडीपासून १२५ ते १३० दिवसात पीक कापणीसाठी तयार होते. हे वाण लांबट आणि बारीक दाण्याचे असून, यातून प्रती हेक्टरी ५० ते ५५ क्विंटल उत्पादन मिळू शकणार आहे. कीड आणि रोगास हे वाण मध्यम प्रतिकारक असणार आहे.

कर्जत-१० : हे वाण गरवा प्रकारातील आहे. ज्याची लागवड केल्या पासून साधारणपणे १४० ते १४५ दिवसात उत्पादन मिळू शकणार आहे. या वाणाची उत्पादकता हेक्टरी ४५ ते ५५ क्विंटल आहे. हे वाण पाणथळ जमिनीसाठी उपयुक्त असणार आहे. प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक असणार आहे.

ट्रॉम्बे कोकण खारा : हे वाण निमगरवा प्रकारातील आहे. लागवडीपासून साधारणपणे १२५ ते १३० दिवसांनी याचे उत्पादन मिळणार आहे. हे वाण लांबट बारीक दाण्याच्या प्रकारातील असून, हेक्टरी ४० ते ४५ क्विंटल उत्पादन मिळणार आहे. कोकण विभागातील क्षारपड जमिनीसाठी हे वाण उपयुक्त असणार आहे. ६ ईसी पर्यंत क्षार सहन करणारा क्षमता या वाणात असणार आहे.

ऊस पोक्का बोइंग रोग नियंत्रण

पोक्का बोईंग हा ऊस पिकावरील बुरशीजन्य रोग आहे. याचा प्रादुर्भाव साधारणपणे पावसाळ्यात किंवा जून ते सप्टेंबर या काळात दिसून येतो. पोक्का बोईंग फ्युसेरियम मोनिलिफॉर्मी या बुरशीमुळे पसरते. शीर्ष भेदक कीटकां प्रमाणे झाडाच्या वरच्या भागावर परिणाम करते. लक्षणांमधील या समानतेमुळे अनेकदा शेतकरी रोगाचे चुकीचे निदान करून पिकामध्ये चुकीच्या बुरशीनाशकाचा वापर करतात. या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झाल्यामुळे उसाच्या रोपाला वाढीसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते, जे प्राथमिक अवस्थेत नियंत्रण पद्धतीवर लक्ष देऊन काही प्रमाणात कमी करता येते. या रोगास को ४१९, कोसी ६७१, व्हीएसआय ४३४, को ८६०३२, एमएस १०००१ आणि कोव्हीएसआय ९८०५ या ऊस जाती बळी पडतात.

पोक्का बोइंग मुळे पिकांचे होणारे नुकसान : रोगाच्या सुरुवातीच्या अवस्थेत, वरची पाने देठाच्या जोडणीवर पिवळी आणि पांढरी होतात. काही दिवसांनी लालसर तपकिरी होऊन सुकतात. शेणखताचा जास्त प्रादुर्भावामुळे पाने एकमेकात गुंतलेली आणि दोऱ्या सारखे दिसतात. कुजतात आणि पडतात. नवीन येणारी पाने इतर पानांपेक्षा लहान असतात. पिकातील प्रकाश संश्लेषण प्रक्रियेवर परिणाम होऊन झाडांची वाढ खुंटते.

पोक्का बोईंग रोगाचा प्रसार : ऊसातील पोक्का बोइंग या रोगाचा प्रसार प्रामुख्याने हवेमार्फत होतो. याशिवाय पाणी, पाऊस व कीटकांद्वारेदेखील या रोगाचा प्रसार होतो; मात्र रोगाचा प्रसार

बेण्याद्वारे होत नाही. पावसाळा हंगामापूर्वी पडलेल्या वळीव पावसामुळे हवेत आर्द्रता वाढते. त्या वेळी पोक्का बोंग या रोगास कारणीभूत असणाऱ्या फुजॅरियम मोनिलीफॉरमी या हवेद्वारे पसरणाऱ्या बुरशीची लागण उसाच्या शेंड्याकडील कोवळ्या पानांवर दिसून येते. उसामध्ये सुरुवातीस तिसऱ्या व चौथ्या पानांच्या बेचक्यात पांढरट पिवळसर पट्टे दिसून येतात.सुरकुत्या पडून पाने आकसतात. त्यांची लांबी घटते. अति तीव्रतेमध्ये पाने सडतात किंवा कुजतात. नंतर गळून पडतात किंवा एकमेकांत गुरफटतात. काही वेळा पोंगेमर किंवा शेंडा कुज दिसून येते. रोगग्रस्त उसाच्या कांड्या वर कांडी काप सारखी लक्षणे दिसून येतात. रोगट उसाच्या कांड्या आखूड झाल्याने व पांगशा फुटलेल्या उसाच्या उत्पादनात घट येते.

पोक्का बोइंग या रोगाचा प्रादुर्भाव : राज्यातील सर्व हवामान विभागात रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. जास्त पर्जन्यमानाच्या ठिकाणी हवेमध्ये वाढलेली आर्द्रता जास्त काळ राहिल्याने रोगाचे प्रमाण वाढते. मॉन्सूनपूर्व वळीव पाऊस झाल्यावर रोगाचा प्रादुर्भाव ऊसाच्या पोग्यात किंवा कोवळ्या पानांवर दिसून येतो.

पोक्कासाठी एकात्मिक उपाययोजना : रोगामुळे शेंडे कुज व पांगशा फुटलेले ऊस शेतातून वेगळे काढावे व नष्ट करावेत, जेणेकरून रोगाच्या प्रसारास काही प्रमाणात आळा बसेल. माती परीक्षणावर आधारित रासायनिक खतांची (मुख्य व सुक्ष्म अन्नद्रव्यांची) मात्रा वेळेवर व योग्य प्रमाणात द्यावी. बोरॉन या सूक्ष्मअन्नद्रव्याची कमतरता असेल तर या रोगाची तिव्रता वाढते. शेतात पाण्यामुळे दलदल होणार नाही, याची काळजी घ्यावी. पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने करावा.

रासायनिक उपाय : टाटा रॅलीस इंडिया लिमिटेड, टाटा ब्लीटॉक्स, कॉपर ऑक्सी क्लोराईड (५०%) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा धानुका, धानुस्टिन, कार्बेन्डाझिम (५०%) १ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा सिजेंटा इंडिया लिमिटेड, एबिक मॅन्कोझेब (७५%)३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरील बुरशीनाशकाच्या १० दिवसांच्या अंतराने स्टिकरसह आवश्यकतेनुसार २ ते ३ फवारण्या कराव्यात.

ऊस पिकातील आंतरपिक व्यवस्थापन

ऊस लागवड केल्यानंतर पूर्ण उगवणीसाठी सहा ते आठ आठवडे कालावधी लागतो. सुरूवातीच्या काळात वाढ हळू होते. उसाच्या दोन सऱ्यांमध्ये मोकळ्या जागेत आंतरपीक घेतल्याने तणांचे प्रमाण कमी होते. सुरू ऊसामध्ये भुईमूग, मेथी, कोथिंबीर, कलिंगड, काकडी व कांदा ही आंतर पिके फायद्याची ठरतात. द्विदल वर्गातील आंतरपीक घेतल्यास जमिनीचा पोत सुधारतो. उसामध्ये आंतरपीक घेतल्याने नक्कीच फायदा होतो. प्रामुख्याने उसाचे निव्वळ उत्पन्नात वाढ होतो. उसाचे बियाणे, खते व आंतरमशागतीसाठी झालेला खर्च आंतरपिकांच्या उत्पन्नातून निघतो.

ऊस पिकात आंतरपीक घेतल्या मुळे होणारे फायदे : ऊस पिकात मोकळी जागा असते तिथे आंतरपिकं घेता येते. आंतरपिके घेतल्याने भरपूर फायदा होतो. प्रामुख्याने आंतरपीक यामुळे एकूण निव्वळ उत्पन्नात वाढ होते. उसासाठी बियाणे, खते व आंतरमशागतीसाठी केलेला खर्च आंतरपिकाच्या उत्पन्नातून निघून जातो. तणांच्या वाढीवर परिणाम होऊन तणांचे प्रमाण कमी होते. द्विदल वर्गातील आंतरपीक घेतल्यास जमिनीचा पोत सुधारतो. ऊस पिकात भुईमूग, कोबी, फुलकोबी, मेथी, कोथिंबिर, कलिंगड, काकडी व कांदा ही आंतर पिके घेतली जातात. वरील प्रमाणे ऊस पिकात आंतर मशागत आणि अंतर पिके घेतली जातात.

१. सुरू ऊस-कांदा : सुरू ऊस सहा ते आठ आठवड्यांचा झाल्यानंतर म्हणजेच त्याचे कोंब जमिनीवर उगवून आल्यानंतर कांदा या पिकाच्या रोपांची वरंब्याच्या दोन्ही बाजूला लागण करावी. या आंतरपिक पद्धतीमध्ये कांद्याला उसाबरोबरच पाणी आणि खते मिळतात. त्यामुळे त्याला वेगळे पाणी आणि खत देण्याची गरज भासत नाही. कांद्याची मुळे ही जमिनीत खूप खोलवर जात नाही. ती फक्त पाच ते दहा सें.मी. एवढ्या खोलवर जातात. त्यामुळे तेवढ्यात जमिनीतून ती

अन्नद्रव्ये शोषून घेतात. त्याचा ऊस या मुख्य पिकावर कोणताही परिणाम होत नाही. विशेषत: सुरूवातीच्या काळात ऊसाची वाढ खूप मंद गतीने होत तर त्याच काळात कांद्याची वाढ जलद गतीने होते त्यामुळे कांदा काढणीसाठी साडेतीन ते चार महिन्यात तयार होतो. आंतरपिक म्हणून लागवड केलेल्या कांद्याची उत्पादकता सरासरी १५० ते २०० क्विंटल प्रति हेक्टरी एवढी मिळते कारण या कांद्याची लागवड आपण रोपाची पुनर्लागन करून केलेली असते असे हे आंतरपिक ऊस या मुख्य पिकाबरोबर पाणी, प्रकाश, अन्नद्रव्ये यांबाबतीत कुठेही स्पर्धा करत नाही. व शेतकर्याला दुहेरी उत्पन्न मिळवून देते.

२. सुरू ऊस + भुईमूग

ही आंतरपिक पद्धती जमिनीशी सुपिकता वाढवण्यासाठी तसेच अतिरिक्त उत्पन्न व नफा मिळवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. सुरू ऊसाचे कोंब जमिनीवर आल्यावर भुईमूग या पिकाची लागवड टोकण पद्धतीने वरंब्याच्या दोन्ही बाजूला करावी. कांद्याप्रमाणेच भुईमूग या पिकाला वेगळी अन्नद्रव्ये तसेच पाणी देण्याची आवश्यकता भासत नाही. सुरूवातीलाच खताबरोबर जमिनीमध्ये अन्नद्रव्ये मिसळलेली असतात तसेच ऊस पिकाच्या गरजेनुसार पिकाला पाणी दिले तरी चालते. भुईमूग हे पीक जमिनीत नत्र स्थिरिकरण करणारे पीक आहे. या पिकाच्या मुळांच्या गाठीत रायझोबियम नावाचे जिवाणू हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण सहजीवी पद्धतीने करतात. भुईमूग या पिकाने जमिनीत स्थिर केलेले नत्र नंतर सुरू ऊस या पिकाला उपलब्ध होते. याचा मोठा फायदा ऊसाला होतो. ऊसाच्या वाढीवर भुईमूग हे आंतरपिकावर कोणताही परिणाम करत नाही. या पद्धतीमध्ये भुईमूगाचे हेक्टरी दहा ते पंधरा क्विंटल उत्पादन मिळवता येते.

३. सुरू ऊस + काकडी/कलिंगड : ही आंतरपिक पद्धती उन्हाळ्यामध्ये काकडी/कलिंगड या वेलवर्गीय फळपिकांना असलेली मागणी लक्षात घेवून केली जाते. या आंतरपिक पद्धतीत जेव्हा सुरू ऊसाचे पीक सहा ते आठ आठवड्याचे होते म्हणजेच ऊसाचे कोंब उगवून जमिनीवर येतात त्यावेळी प्रत्येक वरंब्याच्या एका कडेला साधारणपणे दोन फुट अंतरावर एक बी याप्रमाणे टोकण पद्धतीने लावतात. काकडी/कलिंगड हे वेलवर्गीय फळपिक असल्यामुळे हे जमिनीवर समांतर पद्धतीने वाढते. या वेलाची वाढ वरंब्यावर केली जाते तसेच या वेलाची फळे वरंब्यावर तसेच सरीमध्ये जेथे ऊस कोंबामध्ये अंतर आहे अशा ठिकाणी वाढवली जातात. या आंतरपिकाला कोणत्याही प्रकारे वेगळी अन्नद्रव्ये तसेच पाणी देण्याची आवश्यकता नसते तसेच या पिकांमुळे ऊस या पिकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही तसेच त्याच्या वाढीवर कोणताही परिणाम होत नाही. आंतरपिक पद्धतीमुळे शेतकऱ्यास काकडीचे ७५ ते १०० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पन्न मिळते तसेच कलिंगडापासून २०० ते २५० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पन्न मिळते. ही आंतरपिके तीन ते साडेतीन महिन्यांत येणारी असल्यामुळे ऐन उन्हाळ्यात या आंतरपिकांना बाजारात खूप मागणी असते व तसेच ही आंतरपिके शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवून देतात.

४. सुरू ऊस + मेथी/कोथिंबीर : ही आंतरपिक पद्धती शक्यतो शहरांच्या जवळपास असणार्या ऊस क्षेत्रामध्ये घेतली जाते. उन्हाळामध्ये मेथी/कोथिंबीर या भाज्यांना बाजारात खूप मागणी असते. त्यामुळे शेतकरी नगदी पैसा मिळवण्यासाठी सुरू ऊसात मेथी/कोथिंबीर या भाज्यांची लागवड करावी. ऊस उगवून आल्यानंतर दोन्ही वरंब्याच्या बाजूने मेथी/ कोथिंबीर यांची लागवड करावी. या आंतरपिक पद्धतीमुळे शेतकर्यांना कमी कालावधीत नगदी पैसा पिकावर कोणताही परिणाम होत नाही.

५. ऊस + आले लागवड : उसाबरोबर अद्रकाची सहाय्यक पीक म्हणून लागवड करता येते. उसासोबत सहाय्यक पीक म्हणून आल्याची लागवड करण्यासाठी अर्धा फूट उंचीचे बेड तयार करा, ज्याची रुंदी सुमारे १ मीटर आणि लांबी आपल्या सोयीनुसार ठेवावी. शिफारशीत उपलब्ध बियाणे वापरावे. लावणी करताना २५ ग्रॅम निंबोळी पेंडीची पावडर लागवडीच्या खड्ड्यात जमिनीत मिसळा. लागवड २५ सें.मी रेषा ते ओळ अंतर आणि २० ते २५ सें.मी. कंद ते कंद अंतरावर करा. पेरणीसाठी २० ते ३० ग्रॅम कंद वापरावेत. कंद लावण्यापूर्वी त्यावर चांगले कुजलेले खत आणि ट्रायकोडर्मा बुरशीचा मिश्रणाने उपचार करा.

महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्रॉंग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म:)
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

थोडक्यात

जिल्हास्तरीय लोकशाही दिनात एकुण ७ अर्ज प्राप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे ०७ अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी महसूल, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

परदेशी शिष्यवृत्तीस मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

जिल्हयातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुलामुलींना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२४- २५ साठी विद्यार्थ्यांना दि. १५ जून २०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर योजनेस जाहिरातीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची मुदत दि. ३० जून २०२४ रोजी पर्यंत देण्यात आली होती. तथापी सदर योजनेस मिळालेला प्रतीसाद विचारात घेता दि. १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी परदेशी शिक्षण घेणा-या इच्छुक विद्यार्थी यांनी संचालक मागास बहूजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे येथे अर्ज सादर करुन शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे संचालक, एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

बीड । प्रतिनिधी

येथील कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या गुरुवार दि ८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये वतीने करण्यात आले आहे. हाडाची ठिसुळता ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे.

इनाम जमीन हक्क परिषद बैठकीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने इनामी, देवस्थान जमिनीची मिळकत मूळ मालकाच्या नावे करण्याबाबत सकारात्मक पाऊल उचलले आहे. परंतु याबाबत सखोल मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यासाठी दशनाम गोसावी समीाज परिषदेच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे शनिवार १० ऑगस्ट २०२४ रोजी बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस गोसावी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ॲड.राजेंद्र बन, जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, दत्ता महाराज गिरी यांनी पत्रकाद्वारे केले आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की, राज्यातील सरकारने इनामी, देवस्थान जमिनीची मिळकत मूळ मालकाच्या नावे करण्याबाबत सकारात्मक पाऊल उचलले आहे. परंतु याबाबत सखोल मार्गदर्शन प्राप्त त्यासाठी कोणती प्रक्रिया करावी लागेल,काही इनाम जमिनीच्या बाबतीत आणखीही स्पष्टता आलेली नाही. त्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही व्हावी! यासाठी इनाम धारकांची संघटन शक्ती निर्माण करण्यासाठी तसेच अर्ज व प्रस्ताव कशा पद्धतीने दाखल करावे लागतील यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन आवश्यक आहे व शासनाकडे नियमित पाठपुरावा होणे ही गरजेचे आहे. त्यासाठी इनाम धारकांच्या मागणीनुसार गोसावी समाजातील इनाम धारकांच्या बैठकीचे आयोजन दशनाम गोसावी समाज परिषद बीडच्या वतीने करण्यात आले आहे. तरी आपण सदर बैठकीस आपल्या सातबारा व मूळ कागदपत्रासह उपस्थित रहावे असे आवाहन दशनाम गोसावी समाज परिषद बीड च्या वतीने करण्यात आले आहे.

पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती आहे- भदंत धम्मशील थेरो

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरांमध्ये केसापुरी कॅम्प येथील बौद्धांचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहार येथे दर रविवारी साप्ताहिक बुद्ध वंदना आयोजित केली जाते. या वेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची धम्मदेशना संपन्न झाली. दर रविवारी श्रावस्ती बुद्ध विहार येथे सदधम्म सेवा संघाच्या वतीने साप्ताहिक बुद्ध वंदना व धम्मदेशनेचे आयोजन करण्यात येते.

या बुद्ध वंदनाच्या त्यावेळी माजलगाव तालुक्यातील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. आजच्या पूजेचे यजमान हे ज्येष्ठ केंद्रीय शिक्षिका आयु.लीला ज्ञानोबा उजगरे व डॉ.चंद्रशेखर ज्ञानोबा उजगरे हे होते.

यावेळी पूज्य भदंत धम्मशील थेरो यांनी उपासिका यांना धम्मदेशना दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, आपल्यातील द्वोष कपट भावना नष्ट करण्यासाठी आणि वैराची भावना शमविण्यासाठी मनुष्याला प्रेम पूर्ण मैत्री युक्त करुणामय हृदयाची गरज आहे.व तसेच आपल्या मनातील लोभ नष्ट करण्यासाठी उद्दात्त अंतकरणाची गरज असते . तसेच त्याचबरोबर मानवाला पवित्र जीवन जगण्यासाठी शुद्ध चारित्र्याचे गरज आहे . आपण असत्या पासून दूर होण्यासाठी सत्य ते स्वीकारून आपले जीवन मंगलमय करू शकतो. येणे प्रमाणे जीवन जगत असताना बुद्धांनी सांगितलेल्या पवित्र पंचशीलाच्या पालनातच विश्वाची शांती आहे. असे प्रतिपादन भदंत धम्मशील थेरो यांनी केले. सध्या वर्षावास कालावधी चालू असून दर रविवारी सातत्याने बुद्ध वंदना व धम्मदेशनेचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. तरी माजलगाव तालुक्यातील व परिसरातील बौद्ध उपासक उपाशीकांनी या पवित्र वर्षावास कालावधीमध्ये उपस्थित राहून धम्मदेश नेचा लाभ घ्यावा असे आवाहन सदधम्म सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन ॲड. दशरथ मकसरे यांनी केले.तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी भगवान सातपुते पांडुरंग जाधव, एम.बी चांदमारे, सोपान उजगरे, एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, सौ.विद्याताई निसर्गंध, बबीता सावंत, इंदुमती खळगे, आदी उपस्थित होते.

दासखेड उपकेंद्रला जिल्हाधिकारी कुष्णा जाधव यांची भेट

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील दासखेड येथे आयुष्यमान आरोग्य मंदिर आरोग्य पनम धनम्? उपकेंद्र अतिशय उत्तम पणे तयार होऊन उद्घाटनाच्या अपेक्षा होती परंतु उद्घाघाटन झाले नव्हते. येथील नागरिकांनी व पत्रकार बांधवांनी आवाज उठविल्यानंतर उपकेंद्र चालू झाले. दसखेडचे भुमीपुत्र जिल्हाधिकारी मा.कुष्णाजी जाधव साहेब यांनी आपल्या जन्मभुमीत अनेक सुविधा उपलब्ध झाल्याने स्वता भेट दिली आणि दासखेड प्रा.आ.केंद्र दि.२८ रोजी सुरू झाले आहे.तसेच रुग्णालयात रुग्णांना सुविधा मिळु लागल्याने आनंदी वातावरण निर्माण झाले आहे . याठिकाणी काही सुविधा उपलब्ध व्हावे म्हणून . गावकरी यानी दासखेड गावाचे भुमी पुत्र कुष्णाजी जाधव साहेब मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई यांच्या कडे मागणी केली. मा जाधव साहेब यांनी संबंधित अधिकारी यांना लगेच सुचला केल्या व सर्व कामे तातडीने मार्गी लावा असे म्हणाले.

या वेळी उपस्थित डॉ. शरयु पडोळे सय्यद कादर (आरोग्य पर्यवेक्षक).गिरीश हजारे .(आरोग्य सहाय्यक). पत्रकार डॉ .हरिदास शेलार गणेश मस्के (फार्मसी ऑफिसर) बाळासाहेब गोरे (लॅब टेक्निशियन) राख नितेश कुमार (कनिष्ठ सहाय्यक लिपिक) अश्विनी सोनवणे. गणेश सरडे.अकाश जावळे शुभम राख हे उपस्थित होते . यामुळे प्रथमिक केंद्र मधील अडचणी वेगवेगळ्या कामाविषयी सूचना व सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन जाधव साहेब यांनी केले.

आर्य समाजाच्या वतीने श्रावणी वेद प्रचार महोत्सव

तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

परमेश्वराची अमृतवाणी वेदज्ञानाच्या माध्यमाने सकल मानव मात्राचे सर्वांगीण कल्याण साधावे, सर्वांचे जीवन सुखी व समृध्द बनावे, राष्ट्राचा आधारवड युवक्? निर्व्यसनी व्हावा, व त्यांच्यामध्ये मानवी मूल्ये रुजवावीत, प्रत्येक परिवारामध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी या पवित्र उद्देशाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेच्या वतीने येथे तीन दिवस श्रावणी वेद प्रचार महोत्सवाचे दि.१५ ते १७ ऑगस्ट दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

दि.४ ऑगष्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत श्रावण मास सुरू झाला आहे. त्या निमित्त भव्य स्वरूपात हा महोत्सव संपन्न होत आहे.श्रावणी वेद प्रचारासाठी उत्तर भारतातून उच्च कोटीचे प्रथितयश वैदिक विद्वान ३४ व्याखाते, भजनोपदेशक यांना महाराष्ट्र आर्य प्रतिनिधीने निमंत्रीत केले आहे.दि.१५ ते १७ ऑगस्ट या कालावधीत उत्तरप्रदेश मधील आचार्य पंडीत ओमप्रकाश शास्त्री व प्रसिद्ध भजनोपदेशक पं. प्रतापसिंह चौहान येत आहेत.त्यांच्या अमृतमय वेदवाणी उपदेश व भजनांचा रसिक श्रोत्यांना लाभ मिळणार आहे.वरील कालावधीत पारिवारिक सत्संगाचे आयोजन करण्यासाठी आर्यसमाज पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.तसेच शाळा महाविद्यालयामध्ये विद्वत्जनांचे व्याख्यान व भजनोपदेशक होणार आहे.हे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावीत असे आवाहन महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान स्वामी विद्यानंद सरस्वती, कार्यकारी प्रधान लालाभाई लखमनभाई वेलानी,मंत्री अर्जुनराव सोमवंशी, कोषाध्यक्ष रंगनाथ तिवार,वेदप्रचार अधिष्ठाता प्रा.डॉ.नयन कुमार आचार्य तसेच आर्यसमाज मजलगावचे प्रधान अनंत रुद्रवार, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर,रविंद्र खोडवे, प्रा.सुरेशचंद्र वेळणे, प्रा.जयप्रकाश मलवाडे,प्रभाकर बनसोडे तसेच आर्य समाज संस्थान उपाध्यक्ष गोविंद बजाज,जगदीश साखरे,प्रणित चिद्धवार, बालासाहेब झोडगे,सुखानंद तोष्णीवाल,विजय सोन्नर,अजित भावठाणकर,रमेश चाडक,परमेश्वर निगुत,विलास बनसोडे,महादेव हाके यांनी केले आहे.या महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी व पारिवारिक सत्संग,यज्ञ,प्रवचन भजन तसेच शाळा,महाविधालयात व्याख्यानाचे आयोजनासाठी अनंत रुद्रवार, लक्ष्मीकांत सोन्नर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांचे वतीने करण्यात आले आहे.

रखडलेल्या शेतकऱ्याच्या विहिरीची रक्कम त्वरित द्या-दत्ता वाकसे

मुख्यमंत्री कार्यालय पत्राद्वारे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड माजलगाव मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विहिरीची वाटप करण्यात आले यामध्ये शेतकऱ्यांनी विहिरी खोदल्या तीन मस्टरचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले व राहिलेले पाच ते सात मस्टर शेतकऱ्यांनी पाठवून दिले पण दोन महिन्याचा कालावधी लोटून सुद्धा पैसे जमा झाले नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरी अपुऱ्या राहिल्या अनेक तक्रारी करून सुद्धा पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. त्यांनी त्वरित विहिरीची रक्कम त्वरित शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावी असे पत्र मुख्यमंत्री कार्यालयाकडे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी दिले. जवळील पदरमोड करून विहिरीला खर्च केला विहिरीचा हप्ता आज भेटेल उद्या भेटेल असे म्हणत तीन महिने लोटले पण पैसे आलेच नाही या शेतकरी लाभार्थ्या विषयी सरकारची संवेदना मेली का? सरकारच्या शहाणपणापायी धरतीच्या धनी ला दोन घास अन्न भेटत नाही कसलं हे सरकार काही दया माया नसावी का?असा प्रश्न शेतकऱ्यांच्या नजरेपुढे खेळत आहे कसलं हे शासन माजलगाव मतदार संघातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरीची थकीत पैसे त्वरित मिळावे करिता शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेच्या पत्राद्वारे शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रसिडेंट दत्ता वाकसे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे

केंद्र आणि राज्य सरकारकडून शेतकऱ्याची चेष्टा..!

गेल्या तीन महिन्यापासून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहिरी पंचायत समितीच्या माध्यमातून देण्यात आलेले आहेत परंतु गेल्या तीन महिन्यापासून शेतकऱ्यांनी स्वतःच्या पदर मोड करत व्याजाने कर्ज काढून पैसे उपलब्ध करून विहिरी खोदलेले आहेत परंतु राज्य व केंद्र सरकारकडून राज्यातील शेतकरी सुखावला पाहिजे या भावनेतून रोजगार हमी योजनेच्या विहिरी शेतकऱ्यांना अनुदानाच्या तत्त्वावर दिल्या जातात परंतु गेल्या तीन महिन्यापासून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांचे थकीत विहिरीचे मस्टरचे पैसे आणखीही दिलेले नाहीत त्यामुळे शेतकरी मेटाकोटीला आलेला आहे राज्य सरकारने केंद्र सरकार त्यांनी आत्महत्या केल्यानंतर जागे होणार काय असा सवाल दत्ता वाकसे यांनी केला आहे

बीड शहरात घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीचे आयोजन

घरेलू महिला कामगारांच्या सन्मानासाठी ओमप्रकाश गिरी यांचा पुढाकार

बीड । प्रतिनिधी

एम. ट्रस्टच्या माध्यमातून बीड शहरातील घरेलू कामगारांच्या संवाद बैठकीचे आयोजन नीलकमल हॉटेल नगर रोड बीड येथे आज ३ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते यासाठी एम ट्रस्टचे जिल्हा समन्वय ओमप्रकाश गिरी यांच्या संकल्पनेतून शहरात घरेलू कामगार म्हणून काम करणार्या हजारो महिलांच्या विकासासाठी घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते सदरील बैठकीसाठी एम ट्रस्ट लखनऊ उत्तर प्रदेश चे प्रमुख संजय राय व महाराष्ट्र राज्य प्रमुख प्रीतू उपाध्याय व एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओमप्रकाश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

एम ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून ऊसतोड कामगार महिला कामगार वीट भट्टी कामगार यांच्यासाठी कार्य करण्यात येत आहे. घरेलू महिला कामगार संवाद बैठकीसाठी बीड शहरातील कानाकोपर्यातून धुणे,भांडी करणार्या महिला भगिनी यांची उपस्थिती होती. सदरील बैठकीत महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या घरेलू कामगार मंडळा अंतर्गत लागू असलेल्या योजनेबाबत माहिती देण्यात आली व महिलांनी शासकीय योजनेचा लाभ घेऊन मुलांचे शिक्षण आरोग्य व कौशल्य आधारित व्यवसायाकडे वळावे यासाठी एम ट्रस्टच्या वतीने महिलांचे संघटन उभा करून त्यांना विविध विषयाबाबत कौशल्य ज्ञान देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी घरेलू कामगार महिलांचे संघटन उभा करण्यात येत आहे.

यावेळी अनेक महिलांनी बैठकीत बोलताना आपल्या व्यथा मांडल्या. घरकाम करताना छोट्या बालकांना घरी सोडून रोजगारासाठी दिवस दिवस भटकंती करावी लागत आहे. या कामामुळे आरोग्यावर सुद्धा परिणाम होतो मुलांच्या शैक्षणिक खर्च झेपत नसल्यामुळे अनेक बालकांना उच्च शिक्षण देता येत नाही, कौटुंबिक खर्च झेपत नसल्यामुळे घर काम करावे लागते वआम्ही यापुढे यापुढे संघटित होऊन विविध कौशल्य शिकून यावर मात करू असे मत व्यक्त केले. संजय राय यांनी घरेलू कामगारांना मार्गदर्शन करताना आपल्यात असलेल्या छोट्या छोट्या कौशल्याच्या आधारे आपण सक्षम होऊ शकतो. त्यासाठी सामूहिक प्रयत्नाची गरज आहे शिक्षणाची गरज आहे घरेलू कामगारासाठी एम ट्रस्ट विविध उपक्रम जिल्ह्यात राबवून बीड जिल्ह्यातील घरेलू कामगारांचा आदर्श महाराष्ट्रात नव्हे तर देशात निर्माण झाला पाहिजे यासाठी काम करण्याची ग्वाही दिली. एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओम प्रकाश गिरी यांच्या नेतृत्वात नेहा माळी मनीषा स्वामी यांनी घरेलू कामगारांचे सर्वेक्षण करून शहरातील १००० पेक्षा जास्त महिलांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यापुढे घरेलू कामगार महिलांचा आवाज म्हणून त्यांच्या न्याय हक्कासाठी सक्षम लढा उभा करण्यासाठी घरेलू कामगारांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व महिला कामगारांच्या सन्मानासाठी हे जे संघटन उभे केले आहे अत्यंत महत्त्वाचे आहे उपेक्षित वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे मोठे पाऊल आहे असे प्रतिपादन संजय राय यांनी केले बैठकीच्या यशस्वीतेसाठी एम ट्रस्टचे बाजीराव गिरी महिला संघटक मनीषा स्वामी,सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब ननावरे, घरेलू कामगार मीडिया प्रमुख बालासाहेब सोलंकर, घरेलू कामगार मित्र नेहा माळी गीता काळे अंजली गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेतकरी कामगारपक्षाच्या केंद्रीय कमिटीवर भाई बाळासाहेब घुमरे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे १९ वे अधिवेशन पंढरपुर येथे भाई गणपतराव देशमुख नगरीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये शेतकरी, कामगार, कष्टकरी, दिन-दलीत यांच्या प्रश्नावर सातत्याने विद्यार्थीदशेपासून आंदोलन करणारे व चळवळीत सहभागी असणारे निष्ठावंत कार्यकर्ते माजी नगरसेवक तथा माजी जिल्हा चिटणीस भाई बाळासाहेब घुमरे यांची केंद्रीय कमिटीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली तसेच बीड विधानसभेच्या उमेदवारीचे संकेतही दिल्याचे दिसून येत आहे.

शेकाप पक्षाचे अधिवेशन यापर्षी पंढरपुर येथे संपन्न झाले यावेळी भाई बाळासाहेब घुमरे यांची केंद्रीय कमिटीवर निवड झाली तसेच शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील हे पक्षाने उमेदवारी दिल्यास निवडणुक लढवण्याचे संकेत दिले आहेत. भाई बाळासाहेब घुमरे यांनी विद्यार्थी दशेपासून आजतागायत लाल बावट्याच्या झेंड्याखाली आजतागायत एकनिष्ठतेने काम केले आहे आणि हरहुन्नरी व्यक्तीमत्व म्हणून बाळासाहेब घुमरेंची ओळख आहे. सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून त्यांनी काम केले आहे. तसेच जर शेतकरी कामगार पक्षाने बीड विधानसभा निवडणुक लढविली तर संपुर्ण ताकदीनिशी निवडणुक लढवणार असून जनतेमध्ये लोकांचे प्रश्न आणि सत्ताधार्यांनी केलेली बोगस कामे घेवून जाणार आहोत असेही पत्रकाद्वारे शेतकरी कामगारपक्षाकडून सांगण्यात आले. केंद्रीय कमेटीवर भाई बाळासाहेब घुमरे यांची निवड झाल्याने सर्वस्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

चला सावली पेरूया, आपल्या वयोमानाएवढी झाडे लावू या -सिनेअभिनेते सयाजी शिंदे

शालेय विद्यार्थी व वृक्षदिंडीने अंबाजोगाई शहर झाले हरितमय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आज जगाला वृक्षांची व त्यांच्या संवर्धनाची आवश्यकता आहे. सर्वत्र ग्लोबल वॉर्मिंग झपाट्याने वाढत आहे त्यामुळे वृक्षांची लागवड करणे हे प्रत्येकास क्रमप्राप्त ठरणार आहे. याचमुळे अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शन क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण, वृक्षदिंडी व वृक्षसंवाद व बीजसंस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास राजकिशोर मोदी यांच्या सह प्रख्यात सिनेअभिनेते व वृक्षमित्र सयाजी शिंदे, सिनेलेखक अरविंद जगताप, कृषिमित्र शिवराम घोडके, दगडू लोमटे, राजपाल लोमटे, मनोज लखेरा , सतीश लोमटे, खालेद चाऊस,महादेव आदमाणे,सुनील वाघाळकर, तानाजी देशमुख, यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

या कार्यक्रमात अंबाजोगाई शहरातील रिलायन्स पेट्रोल पंप परिसरातून विविध शाळांतील विद्यार्थ्यांना घेऊन वृक्षदिंडी काढण्यात आली.या वृक्षदिंडीमध्ये वेणूताई चव्हाण कन्या विद्यालय, घाटनागनाथ प्राथमिक विद्यालय, न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी विद्यालय, मानविकास मूकबधिर विद्यालय, योगेश्वरी नूतन विद्यालय, गुरुदेव विद्यालय मोरेवाडी, कॉक्सीट महाविद्यालय, येथील जवळपास तीन हजार विद्यार्थी या वृक्षदिंडीमध्ये सहभागी झाले होते. दिंडीमध्ये विदयार्थ्यांकडून झाडे लावा झाडे जगवा, एक मूल एक वृक्ष, रोप वाढतील प्रदूषण टाळतील, झाडे आहेत जीवनाचे मित्र, झाडे जगवा जीवन सजवा या व अशा प्रकारच्या अनेक घोषणानी परिसर दुमदुमून गेला होता. वृक्षदिंडीमध्ये वृक्षदिंडीसह वारकरी टाळ, चिपळ्या व मृदुन्ग घेऊन पर्यावरण विषयीचे अभंग गात होते.या वृक्षदिंडीचा समारोप वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालय येथे करण्यात आला. या समारोपाच्या कार्यक्रमास सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांची उपस्थिती लक्षणीय अशी ठरली. सर्वप्रथम वेणूताई चव्हाण महाविद्यालयात सयाजी शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. समस्त अंबाजोगाई करांच्या वतीने राजकिशोर मोदी यांनी त्यांचा फेटा बांधून, शाल व वृक्ष देऊन स्वागत व सन्मान केला. नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी केला. यावेळी त्यांनी सयाजी शिंदे हे सहयाद्री देवराईच्या माध्यमातून करत असलेल्या वृक्षसांगोपन व पर्यावरण जागृती मोहिमेचे कौतुक केले. वृक्ष हे मानवाला ऑक्सिजन देण्याचे काम करत असून मानवाला ऑक्सिजन मिळाले नाही तर मानव जगू शकनार नाही त्यामुळे झाडे लावून ती जपली पाहिजे व झाडे व पर्यावरण जपण्याचे काम सयाजी शिंदे हे मनापासून करतात त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. यापुढे आपण व आपल्या कोणत्याही सहकार्याकडून वृक्षतोड केली जाणार नाही याची काळजी घेऊन पर्यावरण जपण्यास सहकार्य करू असे अभिवचन यावेळी राजकिशोर मोदी यांनी दिले.

सिनेअभिनेते व पर्यावरण प्रेमी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. त्यांनी सर्वांना उपस्थित सर्वांना वृक्ष व पर्यावरण जपण्यासाठीची शपथ दिली. महाराष्ट्र राज्यात विशेषतः मराठवाड्यात झाडांचे प्रमाण हे अतिशय कमी आहे. त्यामुळे येथे वर्षानुवर्षे दुष्काळजन्य परिस्थिती उद्भवत असते. तेव्हा हे टाळण्यासाठी चला सावली पेरू या, आपल्या वयाएवढे झाडे लावू या असे आवाहन सयाजी शिंदे यांनी केले. वेळोवेळी आपण शासनाकडे बोट न दाखवता आपण निसर्गासाठी काय योगदान देऊ याचा विचार केला पाहिजे असे मत देखील सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले. त्यांनी रोप कशी लावावीत याचे स्वतः प्रात्यक्षिक करून दाखवत प्रत्येकांनी दिलेल्या बियांचे रोपण करून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वाढलेले हेच झाड आपणास आपल्या आईप्रमाणेच फळांच्या, फुलांच्या व सावलीच्या रूपाने प्रेम देते त्यामुळे त्यांना जपा असे कळकळीचे आवाहन याप्रसंगी सर्वांना केले.या कार्यक्रमाचे संचलन व आभार आनंद टाकळकर यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमात पर्यावरण प्रेमी शैलेंद्र निसर्गध यांनी झाडे व पर्यावरण यावरील गाण्यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले होते. या कार्यक्रमास गणेश मसने, कचरूलाल सारडा, दिनेश भराडीया, संतोष शिनगारे, धम्मा सरवदे, अमोल लोमटे,रुपेश चव्हाण, सुधाकर टेकाळे, अशोक देवकर, प्रकाश लखेरा , रफिक गवळी, अकबर पठाण, अंकुश हेडे, खलील जाफरी, सचिन जाधव, महेश कदम, अजिम जरगर, आकाश कऱ्हाड, विजय रापतवार, सय्यद ताहेर,जावेद गवळी,जमादार पठाण, दत्ता सरवदे,विशाल जगताप,रोहन कुरे,शाकेर काझी, कैलास कांबळे, शुभम लखेरा, शुभम मोदी,चेतन मोदी,मुनिर शाह, दत्ता हिरवे, संतोष चिमणे,शरद काळे, अस्लम शेख, वजीर शेख, अमित परदेशी, रोशन लाड, मुनिर शाह, यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.या संपूर्ण कार्यक्रमास पोलीस प्रशासन त्याबरोबरच एन सी सी चे विद्यार्थी तसेच आरोग्य प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभले.

आ.प्रकाशदादा सोळंके यांनी खा.शरदचंद्र पवार यांना शिकवू नये

तुम्ही पराभवाच्या भितीने थांबलात – प्रा.ईश्वर मुंडे यांचा सोळंकेवर पलटवार

किल्ले धारूर । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, मी खा.शरदचंद्र पवार यांचे बोट धरून राजकारणात आलो. खा.शरदचंद्र पवार हे माझे गुरू आहेत.त्या खा.शरदचंद्र पवार यांना आ.प्रकाशदादा सोळंके यांनी सल्ला शिकवू नये.

माझे वय झाले म्हणून राजकारणातून बाजूला होऊन नवीन नेतृत्व युवक पुतण्याला संधी दिली आहे. अशीच संधी शरद पवारांनी दिली आसती तर घर फुटले नसते असे माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी म्हटले आहे या वर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की आ.प्रकाशदादा सोळंके तुम्ही वय झाले म्हणून थांबला नाहीत तर आगामी विधानसभा निवडणूकीत आपला पराभव दिसू लागल्याने स्वत:ला वाचवून पुतण्याला बळीचा बकरा करत आहात.सोळंके कुटुंबाचे नाव एक नैतिक राजकीय कुटुंब म्हणून घेतले जाते.आम्ही ही त्यांचा आदर करतोत परंतू खा.शरदचंद्र पवार साहेबांवरील टिका सहन केली जाणार नाही असे ही प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले.

सतीश घाटगेंनी स्वखर्चातून शेतीला जोडणाऱ्या रस्त्याचे सुरु केले काम

घनसावंगी । प्रतिनिधी

तालुक्यातील देवहिवरा व राहेरा या गावातील शेतकऱ्यांसाठी महत्वाचा रस्ता कागदोपत्री दाखवून त्याचा निधी हडप करण्यात आला होता. त्यामुळे अनेक वर्षापासून शेतकरी त्रस्त होते. शेतकऱ्यांची ही रस्त्याची अडचण सतीश घाटगे यांनी सोडवली असून समृद्धी कारखान्यामार्फत स्वखर्चातून या रस्त्याच्या कामास सोमवारी सुरुवात झाली.

देवहिवरा ते राहेरा फाटा हा दोन किमीचा रस्ता शासनदरबारी दर्जेदार झाल्याची नोंद आहे. परंतु प्रत्यक्षात पावसळ्यात या रस्त्याने पायी देखील जाता येत नाही. त्यामुळे अनेक वर्ष गावकरी हाल सोसत होते. गावकऱ्यांनी हा प्रश्न सतीश घाटगे यांच्याकडे मांडला. त्यांनी तत्काळ हा प्रश्न मार्गी लावला असून सोमवारी या रस्त्याचे काम देखील सुरु झाले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी युवा मोर्चा तालुकाअध्यक्ष शिवाजीराव कंटुले, राजेंद्र छल्लारे, माऊली धांडगे, अर्जुन भोसले, शंकर बांगर, गणेश गव्हाणे, भागवत बोबडे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

महान गायक किशोर कुमार यांच्या जयंतीनिमित्त अंबाजोगाईत स्वराजली कार्यक्रम संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

चित्रपट अभिनेता, लेखक, निर्माता, दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार अशी बहुआयामी कलाकार म्हणून ओळख असलेल्या महान गायक किशोर कुमार यांच्या अभिनयासह त्यांनी गायिलेल्या गितांचा मोठा प्रभाव भारतीय रसिकश्रोत्यांवर कायम आहे. या आवाजाच्या जादूराची काल अंबाजोगाई येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ तथा शिफा बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये समावेश असलेले डॉ राजेश इंगोले, महाराष्ट्राचे महागायक म्हणून ख्याती असलेले सुभाष शेप यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी किशोर कुमार हे बॉलिवूडचे लोकप्रिय पार्श्वगायक होते. ते एक अभिनेता, निर्माता, संगीतकार, गीतकार, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक देखील होते. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी गायकांपैकी एक म्हणून तो ओळखला जातो. किशोर यांनी हिंदी व्यतिरिक्त मराठी, बंगाली आणि उर्दूसह अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत. त्यांनी सर्वोत्कृष्ट पुरुष पार्श्वगायक श्रेणीसाठी ८ फिल्मफेअर पुरस्कार जिंकले आहेत. या श्रेणीत जास्तीत जास्त फिल्मफेअर अवॉर्ड जिंकण्याचा मानही त्याच्याकडे आहे हे सांगत गेल्या अनेक वर्षांपासून किशोर कुमार यांची जयंती स्वरांजली अर्पण करून किशोरदा यांना मरणोत्तर जिवंत ठेवण्याचे काम करणारे मिलिंद मस्के यांच्यासारखे त्यांचे फॅन्स करत आहेत त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. ◀◀ पान ३ वर

महिला मराठा कृती गटाने मनोज जरांगे पाटील यांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक ४ /८/२०२४ या दिवशी मराठा समाजाचे दैवत आदरणीय जरांगे पाटील यांना सदिच्छा भेट देण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ समाज प्रबोधक मंडळ बीड महिला मराठा कृती गटातील महिला सुमन खाडे,मनीषा जगताप, कावेरी कुराणे, मनीषा उगले, ललिता भोसले, कल्पना रसाळ,शर्मिला शेळक(पत्रकार), काळकुटे ताई या सर्व महिला भगिनींनी जरागे पाटलांना भेट देऊन त्यांना आता उपोषण नको असी विनंती केली.समाजातील मुलांना शैक्षणिक सवलती बाबत चर्चा केली. त्याचबरोबर त्यांच्या घराची पाहणी करत असताना असे लक्षात आले की जरांगे पाटील यांचा वैभव म्हणजे फक्त माणुसकी,घरात चार भांड्याकुंडे शिवाय ◀◀ पान ३ वर

मानसात जन्मलो म्हणून तरी जनसेवा केलीच पाहिजे -खुर्शीद आलम

शेख वसीम,श्रीमती कमल लांडगे,शेख वजीर आतार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

बीड । प्रतिनिधी

खुर्शीद आलम मित्रमंडळाच्या वतीने बार्शीनाका बीड येथे मुस्लिम आरक्षणासाठी बीड ते मंत्रालय पर्यंत पायी प्रवास करणाऱ्या शेख वसीम,नवनिर्वाचित मुख्याध्यापिका कमल लांडगे मॅडम आणि सेवानिवृत्त राज्याध्यक्ष पदी शेख वजीर आतार यांची निवड झाल्याबद्दल यांचे सत्कार कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले होते, सदरील सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड शहर अध्यक्ष तथा बीड नगरपरिषदेचे मा. सभापती बीड खुर्शीद आलम हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक संजय उडान,ऑल इंडिया ओबीसी चे जिल्हाध्यक्ष रफिक बागवान,महेश शिंगण,अमोल अहिरे,अशोक दुधाळ यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते, यावेळी आपले विचार व्यक्त करताना खुर्शीद आलम म्हणाले की आज आपल्याकडे आपल्या कुटुंबासाठी सुद्धा वेळ नाही पण बीड येथील शेख वसीम यांनी मुस्लिम समाजाच्या आरक्षणासाठी बीड ते मुंबई मंत्रालय पर्यंत पायी प्रवास केला असून त्यांना अनेक अडीअडचणी आल्या पण त्यांनी आपले प्रवास पूर्ण करून मंत्रालयाचे मुख्य सचिव यांच्याकडे आपले मागण्या ठेवले असुन समाजासाठी त्यांच्या हा मोठा योगदान आहेत, दुसरे सत्कारमूर्ती अशोक नगर जिल्हापरिषद शाळेचे नवनिर्वाचित मुख्याध्यापिका श्रीमती लांडगे मॅडम यांच्या बाबतीत म्हणाले की लांडगे मॅडम यापूर्वी याच शाळेत शिक्षिका म्हणून होत्या त्यांची पूर्वीचे कार्याची दखल घेऊन जिल्हा परिषदेने त्यांना मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती दिली असून पूर्वीपेक्षाही ते जास्त गतीने कर्तव्य पार पाडतील अशी अपेक्षा खुर्शीद आलम यांनी व्यक्त केली आहे, तर तिसरे सत्कारमूर्ती शेख वजीर आतार हे सेवानिवृत्त झाले असले तरी ते निवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांची व ज्येष्ठ नागरिकांची सेवा करत आहेत म्हणून त्यांचे कामाची दखल घेऊन खुद्द संघटनेने शेख वजीर भाईची महाराष्ट्र निवृत्त संघटनेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड केली आहे, म्हणून ह्या सर्व विद्यमान सत्कारमुर्ती लोकांची सेवा करत आहेत, आज अशी अनेक लोकं आहेत की ◀◀ पान ३ वर

बाल आरोग्य तपासणी अभियानांतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

येथील आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त बालरोग तपासणी अभियानांतर्गत पदव्युत्तर बालरोग विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ऑगस्ट २०२४ रोजी पिंपळवाडी हायस्कूल,पिंपळवाडी ता.जि.बीड येथे शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी भाळवणीचे माजी सरपंच श्री दादाराव बहिरवाळ, समाजसेवक शेख शब्बीर भाई उपस्थित होते.

नवनियुक्त अधिकारी हे समाजाचे भूषण : डॉ.योगेश क्षीरसागर

बीडमध्ये गुजर समाज सेवा संघाच्यावतीने नवनियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गुजर समाजातून एकाचवेळी २५ हून अधिक तरुण नोकरीला लागण्याचा कदाचित हा पहिलाच प्रसंग असेल. गुजर समाज हा अत्यंत कष्टकरी समाज आहे. या समाजातून तरुण शासकीय सेवेत येत असल्याचा आनंद आहे. हे नवनियुक्त अधिकारी समाजाचे भूषण आहेत, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. बीडमध्ये गुजर समाज सेवा संघाच्यावतीने नवनियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा रविवारी (दि.४) सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

व्यासपीठावर ह.भ.प.बबन महाराज बहिरवाळ, संपादक तय्यब शेख, गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजाभाऊ गुजर, उपाध्यक्ष युवराज बहिरवाळ, सुभाष बहिरवाळ, राणा चौहान, रतन गुजर, सचिव शिवाजी घोशीर, सहसचिव ज्ञानदेव खटाणे, माजी जिल्हाध्यक्ष हनुमान डोंगर, कोषाध्यक्ष पंजाब आहेर, महादेव नहीराळे, सचिन बहिरवाळ, संजय डोंगर, बबन बहिरवाळ, राजेंद्र पवार, गणेश बहिरवाळ यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, नवनियुक्त लोकसेवक हे समाजाचे भूषण ठरत असून विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी. समाजासह पालकांनी तरुणांना पाठबळ द्यावे. गुजर समाज आणि क्षीरसागर परिवार हा गत अनेक वर्षांपासून एकत्र आहे. सुख-दुःखात कायम आपण सोबत आहोत. आगामी काळात गुजर समाजाला शहरानजीक जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम करू, असेही ते म्हणाले. यावेळी संपादक तय्यब शेख यांनी नवनियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. समाजाने एकीने रहावे, अशीच ◀◀ पान ३ वर

समाजातील २५ हून अधिक तरुण शासकीय सेवेत

सेवापुर्तीबद्दल सहाय्यक फौजदार राम बहिरवाळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, नवनियुक्त अधिकाऱ्यांमध्ये सा.बां.विभागातील शाखा अभियंता पूजा डोंगर, जि.प. बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता संतोष खटाणे, बँक उपव्यवस्थापक बालाजी, शिक्षक रामेश्वर बहिरवाळ, वनपाल योगेश बहिरवाळ, क्रीडा शिक्षक संतोष डोंगर यांच्यासह २५ हून अधिक जणांचा सत्कार करण्यात आला.

माजलगावात सत्यशोधक महोत्सव उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये युवा नेते अमोल शेरकर यांचे वतीने अण्णाभाउ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमीत्त दि. ४ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात सत्यशोधक महोत्सव महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात साजरा करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिध्द गायिका मंजुषा शिंदे तसेच गायक संतोष मोरे यांचा परिवर्तनातील वादळ वारा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख उपस्थितीत जयसिंग सोळंके, एकनाथ मस्के, राहुल लंगडे, रोहन घाडगे, शंतनु सोळंके, अविनाश जावळे, राकेश साळवे, पवनराजे देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी गायिका मंजुषा शिंदे, संतोष मोरे यांनी अण्णाभाउ साठे यांच्या जिवनचरित्रावरील व आंबेडकरवादी विवीध गीत सादर करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले तर सद्दाम शेख यांच्या मिमीक्रीमुळे श्रोते भारावुन गेले. कार्यक्रमास शहरासह तालुका परिसरातील बहुजन चळवळीतील हजारो जाणकार श्रोत्यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केतन मिसाळ, हनुमंत तुपसौंदर, विक्रम वाघमारे, दिपक शेरकर, राहुल हिवाळे, विकास जाधव, विजय शेरकर, विष्णु कांबळे, बळी वैराळे, जगदीश थोरात, नितीन गायकवाड, मधुर ताटे, सनी शेरकर, बबलु शेरकर, शंकर आलाट, बालाजी आलाट, गणेश आलाट, सुनिल अवचार, बाळु अवचार, यांनी परिश्रम घेतले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

सगळ्यांनी राजीनामे द्या, मला बदल करायचेत; बारामतीत अजित दादा गरजले

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीतील पराभव राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते अजित पवार यांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. त्यात, बारामती लोकसभा मतदारसंघातून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना पराभव पत्कारावा लागल्याने अजित पवारांवर नामुष्कीची वेळ आली. अगोदर मुलाचा पराभव, त्यानंतर पत्नीचा पराभव झाल्याने अजित पवारांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला (छउझ) केवळ एका जागेवर विजय मिळवता आला. रायगड लोकसभा मतदारसंघातून सुनिल तटकरे निवडून आल्याने थोडीशी इज्जत राखली, अशा शब्दात अजित पवारांनी जाहीर भाषणात लोकसभेतील पराभवाची खंत बोलून दाखवली होती. त्यानंतर, आता बारामती (इरीरीळ) दौऱ्यावर असलेल्या दादांकडून बारामतीकरांनाही याचा जाब विचारला जात आहे.

पवारांचं होम ग्राऊंड असलेल्या बारामतीतल्या वृंदावन गार्डन येथे कार्यकर्ता मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी, लोकसभा निवडणुकीतील पराभवाची खंत बोलून दाखवतानास, चक्क माझ्याकडे सगळ्यांनी राजीनामे द्यावेत, असं विधान अजित पवार यांनी केलं. मागे काय झालं त्या बद्दल माझी काही तक्रार नाही, कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो. मी ९ तारखेपासून राज्याचा दौरा करतोय, मी राज्याचा दौरा करत असताना माझं घर मला सांभाळावे लागेल. लोकसभेला अनेक बूथवर आपण कमी पडलो. जे झालं त्याला मी जबाबदार आहे, मला संघटनेत बदल करायचे आहेत. त्यामुळे, माझ्याकडे सगळ्यांनी राजीनामे द्यावेत, अशा शब्दात अजित पवारांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर स्थानिक पदाधिकाऱ्यांना दम भरला. शहर, ग्रामीण, महिला, सगळ्या सेलच्या लोकांनी सगळ्यांनी मला राजीनामे द्यावेत, मी पुढं बघू काय करायचे ते. लोकं म्हणतात त्यात तेल ओतण्याचे काम केलं, आपल्या स्टेजवर बसायचं आणि मागे वेगळं बोलायचं. माझं काटेवाडी प्लस मध्ये गेलं म्हणून मला बोलण्याचा अधिकार आहे, असेही अजित पवारांनी कार्यकर्ता मेळाव्यात सुनावले. ज्या बुथवर आपण आहोत त्याने आकडेवारी बघून मान्य केलं पाहिजे. मला शेती करायची आवड आहे मी सकाळी ६ वाजता विहिरीचे काम सुरू आहे, ते बघायला गेलो होतो. शेतकऱ्यांचे बिल भरायचं तर १५ हजार कोटींचा भार येणार होता तो आम्ही उचलला. ५ वर्षांच्या वीज बिल माफीचा जीआर देखील काढला आहे. मी अर्थसंकल्प सादर करताना असा संकल्प जाहीर करेल असे विरोधकांना वाटलं नाही. मला यायला वेळ लागला पण त्याचा तुम्ही असा विचार करू नका की निकाल असा लागला म्हणून दादा नाराज आहे. निवडणुकांमध्ये असा निकाल लागला ठीक आहे, माझं वय ६५ झालं आहे, मी जेष्ठांमध्ये मोडतो, तरीही मी काम करतोय, असेही अजित पवार यांनी यावेळी म्हटले.

लोकसभेला मतदान केलं नसेल त्यांनाही फॉर्म भरु द्या

लाडकी बहीण चुनवी जुमला म्हणून सांगितले, अशा योजना वेगवेगळ्या राज्यात राबिवल्या जातात. संजय गांधी निराधार योजनेचे पैसे कालांतराने वाढवले. सरकारला गरीब जनतेला मदत करायची आहे. पण त्यात लोकांना काही फसवणूक करू नका, कोणतीही योजना आणल्यावर काही त्रुटी राहतात. जिने आपल्याला लोकसभेला मतदान दिले नसले तरी तिला फॉर्म द्या, इथे पक्ष आणू नका, असे म्हणत लाडकी बहीण योजनेवर अजित पवारांनी भाष्य केलं. आचार संहिता लागेपर्यंत जे कुणी फॉर्म येईल त्यांना जुलै,ऑगस्ट,सप्टेंबरचे पैसे मिळतील. काहीजण फॉर्म भरणाऱ्यांना तुसड्यासारख वागत होते. अरे घरात आई-बहीण आहे का नाही? असं वागायचं असेल तर तुम्ही गर्दीच्या ठिकाणी येऊ नका. जर तुमचा मूड नसेल तर मूड नीट होईपर्यंत पब्लिक मध्ये येऊ नका. जर कुणी अस वागले तर मी पक्षातून हकालपट्टी करेल, असा दमही अजित पवारांनी कार्यकर्त्यांना दिला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता पुणे जिल्ह्यातून पावणेदहा लाख अर्ज प्राप्त

पुणे । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता जिल्ह्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी ९ लाख ७२ हजार ८१९ अर्ज सादर केले असून अर्जाची छाननी प्रक्रिया मोहीम स्तरावर सुरू करण्यात आली आहे.

हवेली तालुक्यात ३ लाख ५४ हजार ९७, पुणे शहर ७५ हजार ८१७, बारामती ६८ हजार ६२२, इंदापूर ६३ हजार ४८६, जुन्नर ५९ हजार ३१, शिरुर ५७ हजार २८७, खेड ५४ हजार ८०२, दौंड ५२ हजार ३४, मावळ ४६ हजार १३, आंबेगाव ३९ हजार ७५, पुरंदर ३७ हजार ९६७, भोर २९ हजार ४११, मुळशी २७ हजार ४३४ आणि वेल्हा ७ हजार ७४६ असे एकूण ९ लाख ७२ हजार ८१९ अर्ज सादर करण्यात आले आहेत. पैकी ८५.५७ टक्के अर्जांवर निर्णय घेण्यात आला असून ७८.७८ टक्के अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी २ लाख २८ हजार ४७४ अर्ज हे ऑफलाईनरित्या प्राप्त झाले होते. त्यातील १ लाख ८९ हजार ९०२ अर्ज पोर्टलवर भरण्यात आले असून इतर अर्जांवरील प्रक्रिया सुरू आहे. छाननी प्रक्रियेत आतापर्यंत ७ लाख ६६ हजार ३९२ अर्ज स्वीकारण्यात आले आहेत, तर ७९५ अर्ज नाकारण्यात आले आहेत. ६५ हजार २६५ अर्ज दुरुस्तीसाठी पुन्हा सादर करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. त्रुटी असलेल्या अर्जांबाबत संबंधित महिलांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे कळविण्यात येत असून त्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता करून कागदपत्रे सादर करावे तसेच उर्वरित पात्र महिलांनी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्येष्ठ गांधीवादी नेत्या शोभना रानडे यांचे निधन

पुणे, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या आणि निराधार महिला, मुलांसाठी सेवा कार्य उभ्या करणाऱ्या समाजसेविका शोभना रानडे यांचे वृद्धापकाळाने रविवारी निधन झाले. त्या ९९ वर्षांच्या होत्या. सामाजिक कार्यासाठी केंद्र सरकारने २०११ मध्ये रानडे यांचा पद्मभूषण किताबाने गौरव केला होता.

शोभना रानडे यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९२४ रोजी पुण्यात झाला होता. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांची आगाखान पॅलेस येथे महात्मा गांधी यांच्याशी भेट झाली. ही भेट त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. त्यांच्या भेटीने शोभना यांनी आयुष्यभर गांधीवादी आदर्श स्वीकारले. रानडे यांचे जीवन निराधार स्त्रिया आणि बालकांसाठी समर्पित होते. आसाममधील उत्तर लखीमपूर येथे १९५५ मध्ये त्या विनोबा भावे यांच्यासमवेत पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या. मैत्रेयी आश्रम आणि शिशु निकेतनमधील पहिले बाल कल्याण केंद्र स्थापन करण्यात त्यांनी मदत केली. त्यांनी नागा महिलांना चरखा विणण्याचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबवण्यासाठी आदिम जाति सेवा संघ ही मोहीम सुरू केली. सन १९७९ मध्ये पुण्यात परतल्यानंतर आगाखान पॅलेस येथे असलेल्या गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटी आणि प्रशिक्षणासाठी एक संस्था स्थापन करण्यात मदत केली. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या नेतृत्वाखाली रानडे यांनी १९९८ मध्ये कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग विद्यालय ही निराधार महिलांसाठी एक संस्था सुरू केली. त्याद्वारे महिलांना व्यापार आणि कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यांनी पुण्यातील सासवड येथे स्थापन केलेला बालगृह आणि बालसदन हा आणखी एक बालकल्याण प्रकल्प सुरू केला. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या माध्यमातून गंगा वाचवा चळवळ, गंगा नदीला प्रदूषणापासून वाचवण्याच्या मोहिमेमध्ये रानडे यांचाही सहभाग होता. रानडे या कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट, गांधी स्मारक निधी, बालग्राम महाराष्ट्रच्या विश्वस्त, गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या सचिव, अखिल भारतीय महिला निरक्षरता निर्मूलन समिती, अखिल भारतीय महिला परिषद आणि भूदान ग्राम दान मंडळ महाराष्ट्र या संस्थेच्या अध्यक्ष होत्या. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले होते.

मतदार नोंदणीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत-डॉ.दिवसे

पुणे । प्रतिनिधी

मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारांनी २० ऑगस्टपर्यंत आपले अर्ज मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे सादर करावेत किंवा ऑनलाईन भरावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ रोजीच्या अर्हता दिनांकाच्या आधारे मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक निश्चित केले आहे. त्याअंतर्गत प्रारूप मतदार यादी ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. २० ऑगस्टपर्यंत मतदार नोंदणी, नाव, पत्ता आदी तपशीलात बदल करण्यासाठी दावे व हरकती दाखल करता येणार आहेत.

मतदार नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक ६, नाव समाविष्ट करण्यास हरकत, यादीत यापूर्वीच समाविष्ट असलेले नाव वगळणे, स्थलांतर झाल्यामुळे नाव वगळणे आदींसाठी नमुना क्र. ७, पत्ता बदल, तपशीलात दुरुस्ती, दुबार इपीक कार्ड मिळणे आदींसाठी नमुना क्र. ८ हे अर्ज ऑनलाईनरित्या भरण्यात येत आहेत. याबाबत संबंधितांना एसएमएस पाठविण्यात येत आहेत. एसएमएस (झींपश) प्राप्त झाल्यावर त्वरित संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन आवश्यक माहिती आणि कागदपत्रे द्यावी. मतदार नोंदणी मोहिमेत नागरिकांनी सहभाग घेऊन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ.दिवसे यांनी केले आहे.

मित्रानेच केले मित्रावर धारदार शस्त्राने वार; तिघांवर गुन्हा दाखल

उरुळी कांचन । प्रतिनिधी

गटारी अमावस्येला मित्रांसोबत हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या युवकावर किरकोळ कारणारून धारदार शस्त्राने वार केल्याची घटना रविवारी (ता.४) रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास थेऊर (ता. हवेली) येथील दिल्लीवाला गोठा परिसरात घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

दीपक जाधव (वय २४), सनी पवार (वय-२४), विजय जाधव (वय १८, सर्व रा. थेऊर, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी सोहेल इसाक शेख (वय २०, रा. आलिफनगर, थेऊर, ता. हवेली) या युवकाने फिर्याद दिली आहे.

लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोहेल शेख व त्यांचे मित्र सुरज शेख, प्रवीण चोपटे, विजय जाधव, सनी पवार, दीपक जाधव व विनायक गाढवे हे रविवारी रात्री गटारी अमावस्या निमित्त जेवणासाठी थेऊर नायगाव रस्त्यावरील दिल्लीवाला गोठा परिसरातील एका हॉटेलमध्ये गेले होते.

जेवण झाल्यानंतर शेख व दीपक जाधव, सनी पवार, विजय जाधव यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून वादावादी होऊन हाताने मारहाण व शिवीगाळ झाली. या वेळी सनी पवार याने धारदार शस्त्राने फिर्यादी सोहेल शेख यांच्या डोक्यात वार करून त्याला जखमी केले. त्यांच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी सोहेल शेख याने तिघांविरोधात तक्रार दिली. त्यानुसार आरोपींच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दीड वर्षांत दुप्पट नफ्याचे आमिष; माजी सैनिकांची ७३ लाख रुपयांची फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

गुंतवणुकीवर दीड वर्षांत दुप्पट नफ्याचे आमिष दाखवून माजी सैनिकांसह त्यांच्या नातेवाइकांची सुमारे ७३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी एका माजी सैनिकासह सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी राजेश गोरख यादव (वय-४०, रा. खेंगरेवाडी, ता. पुरंदर) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नरेंद्र बाळू पवार (वय-४१, रा. मालेगाव, नाशिक), माजी सैनिक गणेश माळवदे (वय-४२, रा. छत्रपती संभाजीनगर), प्रफुल्ल कांबळे (वय-४२, रा. पुणे), शुभांगी पवार (वय-३६, रा. मालेगाव, नाशिक), स्वप्नील ठाकरे (वय-३८, रा. मुंबई), संदीप मुळे (वय-३८, रा. पुणे) अशी गुन्हा दाखल केलेल्या संशयितांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यादव लष्करातून निवृत्त झाले आहेत. त्यांची एका माजी सैनिकामार्फत माळवदेशी ओळख झाली. त्याने यादव यांना नरेंद्र पवारच्या समृद्ध भारत ट्रेडिंग सर्व्हिसच्या गुंतवणूक योजनेची माहिती दिली. तसेच, आरोपींनी सेमिनारचे आयोजन केले. त्यांना गुंतवणूक केलेली रक्कम २० महिन्यांत दुप्पट आणि मूळ गुंतवणुकीवर दरमहा १० टक्के रक्कम परत देण्याचे आमिष दाखवले. त्यानुसार १९ माजी सैनिक आणि त्यांच्या नातेवाइकांनी योजनेत गुंतवणूक केली. परंतु आरोपींनी त्यांना मुद्दल आणि व्याज परतावा दिला नाही. आरोपी खराडीतील कार्यालय बंद करून पसार झाले. चंदननगर पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

पुण्यातील प्रवास होणार सुसाट?, रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी मोहोळ यांचे महापालिकेला निर्देश

पुणे । प्रतिनिधी

पुणे महापालिका हद्दीत १५ वार्ड ऑफिस असून या प्रत्येक वॉर्ड ऑफिसला प्रत्येकी दोन अशा ३० टीम तयार करुन खड्डे बुजवणे आणि वाहतूक नियोजन करा, असे निर्देश केंद्रीय सहकार आणि हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महापालिकेला दिले. महापालिक आणि पोलीस यांनी एकत्र काम करावे, असा सल्लाही मोहोळ यांनी पोलीस आणि महापालिका प्रशासनाला दिला. शिवाय येत्या काही दिवसांत शहरात एकही रस्त्यात खड्डा राहाता कामा नये, असा दमही मोहोळ यांनी महापालिका प्रशासनला भरला. त्यावर पुढील ४-५ दिवसांस खड्डे बुजवण्याची कार्यवाही करु, असे आश्वासन महापालिका प्रशासनाने दिले आहे.

पुणे शहरात गेली काही दिवस पावसाचा जोर कायम असून याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर झाला आहे. शिवाय शहरात ठिकठिकाणी खड्डेही मोठ्या प्रमाणाच झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले आणि पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची एकत्रिक बैठक घेतली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मोहोळ यांनी म्हटलं की, पुणे शहरात एकूण १४०० किलोमीटरचे रस्ते असून खड्डे बुजवण्यात महापालिका कमी पडत आहे. प्रशासनाने यावर काम केलं पाहिजे. शिवाय वार्ड ऑफिसर रस्त्यावर असणे आवश्यक असून वाहतुकीचे नियोजन व्यवस्थित झाले पाहिजेत. या दोन्ही विषयांसंदर्भात पुढील आठवड्यात पुन्हा बैठक घेणार असून लोकप्रतिनिधी म्हणून आमचे लक्ष आहे. वाहतूक नियंत्रण करण्यासाठी महापालिकेचे सर्व वॉर्डन रस्त्यावर उतरावेत. शिवाय होम गार्डचे मनुष्यबळही पुरेपुर वापरून वाहतूक सुरुळीत करावी. शिवाय होम गार्डची उपलब्धता पुणे पोलिसांनी करुन द्यावी, अशीही सूचना मोहोळ यांनी बैठकीत केली. ठेकेदारांनी रस्त्यांची जबाबदारी घ्यायला हवी. पण जो कोणी घेत नसेल, त्यांच्यावर कारवाई करायला हवी. शिवाय कामात हयगय करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालू नका. आम्हाला पुण्यातील रस्ते आणि वाहतूक सुरुळीत झालेली पाहिजे, असेही निर्देश दिल्याचे मोहोळ म्हणाले.

पुण्यात पूररेषेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही : मुख्यमंत्री

पुणे : पूर रेषेबाबत आणि नदीपात्राबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही. शेवटी लोकांच्या जीविताशी निगडित प्रश्न आहे. पुराच्या पाण्यामुळे लोकांना त्रास होऊ नये, यासाठी पाटबंधारे विभागाची सर्व टीम समन्वय ठेवून काम करत आहे. आता पूरपरिस्थिती नियंत्रणात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. ५) सांगितले.

खडकवासला धरणाची पाहणी केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

पावसाळा अजून सुरू असून पुराच्या पाण्यामुळे लोकांना त्रास होऊ नये. यासाठी सर्व पाटबंधारे विभागाची टीम समन्वय ठेवून काम करत आहे. लोकांना पुराचा धोका होऊ नये, यासाठी योग्य नियोजन आणि समन्वय करून पाटबंधारे विभागाचे अधिकारी करत काम आहेत, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. नदीपात्राची कॅपॅसिटी वाढवली, नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण केले तर पुराच्या पाण्याचा लोकांना होणारा त्रास कमी होईल. महाडमध्ये पण असाच प्रकार होत होता, मात्र आता तसं होत नाही.असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. खडकवासला धरणाची कॅपॅसिटी आणि पाणी सोडण्याचा ताळमेळ बसवायला लागतो. पाणी थांबवून ठेवले तर धरणाला धोका होऊ शकतो. म्हणून हे सगळं पाहून काम करावे लागणार असून भविष्यात लोकांना त्रास होऊ नये, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पूर रेषेबाबत आणि नदीपात्राबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही. शेवटी लोकांच्या जीवाचा प्रश्न आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

लंडन येथील आयओडीच्या सदस्यपदी 'सूर्यदत्त'चे डॉ. संजय चोरडिया यांची नियुक्ती

पुणे, - लंडन येथील इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स (आयओडी) या संस्थेच्या सदस्यपदी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांची नियुक्ती करण्यात आली.

'आयओडी' ही युनायटेड किंग्डमसह जगभरातील कॉर्पोरेट संचालक आणि वरिष्ठ अधिकारी यांची सर्वोच्च व्यावसायिक संघटना आहे. या परिषदेत संबंधित विविध विषय आणि प्रश्नांवर चर्चा होते. या सदस्यांमध्ये सर्व घटकांतील तज्ज्ञांचा समावेश आहे. डॉ. संजय चोरडिया यांचा व्यापक आणि वैविध्यपूर्ण अनुभव लक्षात घेऊन त्यांना संस्थेचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या नियुक्तीमुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संचालक, व्यावसायिक, धोरण निर्माते आदींसह चांगला समन्वय साधता येणार आहे. त्याचबरोबर व्यवसाय सल्ला प्रकल्प, इंटर्नशिप्स आणि इतर उपक्रमांतून सूर्यदत्तच्या विद्यार्थ्यांना भारतातील आणि परदेशातील कंपन्यांशी जोडण्यास मदत होणार आहे. डॉ. संजय चोरडिया जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले उत्साही शिक्षणतज्ज्ञ, ग्लोबल कोच, उद्योग आणि व्यवस्थापन व्यावसायिक, दूरदर्शी, परोपकारी व्यक्तिमत्व आहेत. त्यांना ऑटोमोबाइल उद्योगातील ४० वर्षांचा आणि शिक्षण क्षेत्रातील २८ वर्षांपेक्षा अधिक प्रदीर्घ अनुभव आहे. केंद्र सरकारच्या कच्चा माल संचालन समिती, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, टेलिफोन सल्लागार मंडळ इत्यादी अनेक संस्थांमध्ये सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

सख्ख्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्यास २४ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

पुणे । प्रतिनिधी

मामाच्या घरी आलेल्या दोन अल्पवयीन मुलींना लग्न लावून देण्याच्या आमिषाने पळवून नेत त्यांच्यावर अत्याचार केल्याप्रकरणात एकास न्यायालयाने २५ वर्षे सक्तमजुरी आणि सात हजार ५०० रुपयांचा दंड सुनावला आहे. या गुन्ह्यात दोन अल्पवयीन आरोपींचा देखील सहभाग होता. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला.

धनंजय सखाराम राजीवडे असे शिक्षा सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. चार आणि पाच एप्रिल २०१५ ला वारजेमध्ये हा प्रकार घडला होता. घटनेच्या दिवशी राजीवडे याने अन्य दोन अल्पवयीन युवकांच्या मदतीने १४ व १६ वर्षीय सख्या बहिणींना लग्नाचे आमिष दाखवून दुचाकीवरून पळून नेले. तसेच, मुलींना त्यांच्या वडील व चुलत्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पुणे जिल्ह्यासह सोलापूर जिल्ह्यातील एका गावात नेऊन त्यांच्यावर तिघांनी लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी राजीवडेसह दोन अल्पवयीन मुलांच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. या खटल्याचे कामकाज सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील नितीन कोंघे यांनी पाहिले. त्यांनी ११ साक्षीदार तपासले. त्यामध्ये मुलींची साक्ष महत्त्वाची ठरली. आरोपींनी केलेला गुन्हा हा समाजविरोधी आहे. समाजात चांगला संदेश जावा यासाठी न्यायालयाने त्यांना अधिकाधिक शिक्षा देण्याची मागणी ॲड. कोंघे यांनी केली. न्यायालयाने सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे निकालात नमूद केले.

पुणेकरांना वाहतूक कोंडीपासून दिलासा; शहरातील २५ मार्गांवर जड वाहनांना प्रवेश बंदी

पुणे । प्रतिनिधी

वाढती वाहतूककोंडी आणि वाढते खड्डे हे पुणेकरांसाठी त्रासदायक विषय ठरले आहेत. खड्ड्यांमुळे वाहतूककोंडी वाढत असल्यामुळे यावर प्रशासनाने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दरम्यान पुणे पोलीस उपायुक्तांकडून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आदेश देण्यात आहे. याअंतर्गत १२ ऑगस्टपर्यंत सकाळी ९ ते रात्री १० या काळात शहरातील २५ मार्गांवर जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. यामुळे शहरातील वाहतूक कोंडीत काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. (झींपश ढीरषषळल गरा)

पुणे शहरामध्ये पावसामुळे रस्त्यांची चाळण झाली आहे. पावसाचं पाणी साचून राहिल्यामुळे रस्त्यांची वाहन क्षमता कमी झाली आहे. शहरातील रस्त्यांवरील जड वाहनामुळे देखील रस्त्याची वाहन क्षमता कमी झाली. वाहतूक कोंडी त्याचप्रमाणे नागरीकांच्या सुरक्षिततेला बाधा यामुळे निर्माण झाली आहे. वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहण्याकरीता पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमधील खालील चौकामधून पुढील रस्त्यांवर १२ ऑगस्टपर्यंत अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून इतर सर्व प्रकारच्या जड वाहनांना (डंपर, ट्रक, आर.एम.सी. मिक्सर व इतर) पुणे शहरामध्ये सकाळी ९ ते रात्री १० दरम्यान प्रवेश बंद राहील.